Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639

Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)

THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS

{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# ग्रामसभा: वाटचाल आणि आव्हाने

**प्रा.डॉ. सुरेंद्र अंबर मोरे,**

**राज्यशास्त्र विभाग प्रमुख,**

**झेड.बी.पाटील महाविदयालय,**

**धुळे. जि. धुळे.**

## प्रस्तावना (Introduction)

गावाच्या स्थानिक कारभारात ग्रामसभेला विशेष स्थान देण्यात आले आहे. ग्रामपातळीवरील प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. ग्रामसभेत ग्रामसभेत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रौढ नागरिकांचा अंतर्भाव होतो. म्हणजे ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील सर्व प्रौढ नागरिकांना किंवा मतदारांना गावाच्या कारभारात सहभागी होण्याची आणि ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याची संधी मिळते. सन १९९३ च्या त्र्याहत्तराव्या घटनादुरूस्तीने राज्यघटनेत पंचायती हा नववा भाग नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. या भागातील कलम २४३ (अ) मध्येदेखील ग्रामसभेचा उल्लेख आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, राज्याचे कायदेमंडळ कायद्यानुसार ठरवून देईल त्याप्रमाणे ग्रामसभा गावपातळीवर अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील. थोडक्यात, भारतीय राज्यघटनेनेदेखील ग्रामसभेच्या अस्तित्वाची दखल घेतली आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे (objective of Research)

ग्रामसभांपुढील आव्हानांचा ग्रामीण राजकारणाचे विशिष्ट स्वरूप, सामान्य जनतेची राजकीय उदासीनता, अज्ञान व निरक्षरता, पदाधिकाऱ्यांकडून उपेक्षा, खेडयांची सामाजिक रचना, स्त्रियांची उदासीनता या संदर्भात आढावा घेणे.

## संशोधन पद्धती (Research Method)

प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. ज्यामध्ये ग्रामसभांपुढील आव्हानांचा आढावा विशेषत: ग्रामीण राजकारणाचे विशिष्ट स्वरूप, सामान्य जनतेची राजकीय उदासीनता, अज्ञान व निरक्षरता, पदाधिकाऱ्यांकडून उपेक्षा, खेडयांची सामाजिक रचना, स्त्रियांची उदासीनता या संदर्भातील बाबींचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने संशोधन विषयाच्या संदर्भातील संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे.

## ग्रामसभांपुढील आव्हानांचे विश्लेषण:

पंचायत राज्यव्यवस्थेत आणि विशेषतः ग्रामपातळीवरील प्रशासनात ग्रामसभेची भूमिका अत्यंत महत्वाची ठरू शकते. हे जरी खरे असले तरी राजकीय तत्व व राजकीय व्यवहार यांमध्ये नेहमीच तफावत आढळून येते. ग्रामसभेच्या संर्दर्भातही आपणास तोच अनुभव येतो. महाराष्ट्रात ग्रामसभेला सध्या असलेले स्थान विचारात घेता ती अगदीच दुर्लक्षित राहिली आहे किंवा तिची मोठया प्रमाणावर उपेक्षा झाली आहे असे म्हणावे लागते. ग्रामसभेला अशा प्रकारचे दुययम स्थान प्राप्त होण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील

सामान्य जनतेची राजकीय उदासीनता हे ग्रामसभा निष्क्रिय बनण्याचे आणखी एक महत्वाचे कारण होय. आपल्या देशातील सामान्य जनता विशेषतः खेडयापाडयांतील जनता अजूनही राजकारणाच्या बाबतीत बरीच उदासीन आहे. राजकारणाशी आपले काय देणे-घेणे आहे. असे तिचे म्हणणे असते. खेडयातील लोकांना तर राजकारणाची फारशी जाण नसते ग्रामपंचायतीची प्रमुख कर्तव्ये कोणते, ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना कोणते अधिकार असतात. ग्रामपंचायतीचा कारभार कसा चालतो. तिचे आर्थिक व्यवहार कसे केले जातात. याविषयी सामान्य लोकांना फारशी माहिती नसते. ती माहिती करून घेण्याची उत्सुकताही त्यांच्या ठायी नसते. त्यामुळे ग्रामसभेच्या बैठकीत लोकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा बाळगता येत नाही.

ग्रामसभेला दुययम स्थान प्राप्त होण्यास ग्रामीण राजकारणाचे विशिष्ट स्वरूप कारणीभूत झाले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणावर धनदांडग्या लोकांचा आणि समाजातील प्रभावशाली वर्गाचा विशेषतः उच्च जातीच्या लोकांचा फार मोठा प्रभाव आहे. ग्रामपंचायतीची सत्ता सामान्यतः याच लोकांच्या हाती असते. गावात कितीही गटबाजी असली तरीही प्रतिस्पर्धी गटांचे नेतृत्व याच वर्गाच्या हाती असते अशा परिस्थितीत गावातील सामान्य लोक ग्रामपंचायतीमधीलइ सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची हिंमत करू शकत नाहीत. त्यामुळे ग्रामसभेच्या बैठकींना फारसा अर्थ उरत नाही. ग्रामसभेची बैठक घेण्यात आली तरी त्या बैठकीत सामान्य माणसे आपले विचार बालून दाखविण्याचे किंवा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना विरोध करण्याचे धाडस करू शकत नाहीत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजातील सामान्य लोकांच्या राजकीय उदासीनतेने एक प्रमुख कारण त्यांचे अज्ञान व निरक्षरता हे आहे. अलीकडील काळात शिक्षणाचा बराच प्रसार झाला असता तरी अद्यापही साक्षरताप्रसाराच्या बाबतीत ग्रामीण व नागरी समाजात निर्माण झालेली दरी तशीच कायम आहे. म्हणजे नागरी समाजाच्या तुलनंत ग्रामीण समाजात शिक्षणाचा प्रसार बराच कमी आहे. उच्चशिक्षित व्यक्ती ग्रामीण भागात अगदीच कमी प्रमाणात आढळून येतात. ग्रामीण जनतेचे अज्ञान व निरक्षरता यामुळे त्यांना आपल्या

राजकीय व इतर हक्कांची फारशी जाणीवच झालेली नसते. त्यामुळे राजकारणाच्या बाबतीत ते अगदीच उदासीन राहतात. त्याचा प्रत्यय आपणस ग्रामसभेच्या बैठकींच्या वेळी हमखास येतो. सामान्य लोक राजकीय दृष्टया उदासीन राहिले तरी सरपंच उपसरपंच या ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामसभेला प्रतिष्ठा मिळवून द्यायची ठरविले तर ग्रामसभा आहे त्या स्थितीतही महत्वाची भूमिका पार पाडू शकते. परंतु ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचाच ग्रामसभेकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपेक्षेचा असतो. गावातील लोकांनी आपल्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा, आपणास प्रश्न विचारावेत ही गोष्ट पदाधिकाऱ्यांना म्हणजेच गावाच्या पुढाऱ्यांना मनापासून आवडत नाही.

गावातील लोक ग्रामसभेच्या बैठकीकडे पाठ फिरवितात किंवा बैठकीत सहभागी होण्यास अनुत्सुक असतात अशी तक्रार काही वेळा केली जाते, पण लोकांच्या या उदासीनतेचे एक कारण हे असते की, ग्रामसभेच्या बैठकीत गावातील लोकांच्या समस्या, अडीअडचणी, गावापुढील महत्वाचे प्रश्न यांसंबंधी क्वचितच चर्चा केली जाते. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी केवळ कायद्याचे बंधन आहे म्हणून ग्रामसभेची बैठक आयोजित करतात. एक उपचार म्हणून ते या बैठकीकडे पाहतात. साहजिकच. कशीबशी बैठक उरकणे एवढाच त्यांचा बैठकीच्या आयोजनामागील उद्धेश असतो. अशा स्थितीत ग्रामसभेत कसलीही उपयुक्त चर्चा होत नाही, त्यामुळे गावातील लोकही ग्रामसभेच्या बैठकीला फारसे महत्व देत नाहीत. खेडयांची सामाजिक रचना किंवा तेथील समाजव्यवस्था हादेखील ग्रामसभेसारख्या संस्थेला निष्प्रभ बनविण्यास कारणीभूत झ ाालेला एक महत्वाचा घटक होय. आपली सामाजिक व्यवस्था जातिसंस्थेशी जोडली गेली आहे. ग्रामीण समाजात आजदेखील जातिव्यवस्थेचा प्रभाव मोठया प्रमाणावर दिसून येतो. जातिसंस्थेने घातलेल्या विविध निर्बंधांचे पालन करण्यावर ग्रामीण जनतेचा कटाक्ष असतो. जातिसंस्थेचा प्रभाव येथील राजकारणावरदेखील जाणवतो. ग्रामीण समाजातील राजकारण बरेचसे जातीवर आधारित असते. अशा वातावरणात समाजातील कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातींचे लोक आपल्या राजकीय हक्कांविषयी फारसे आग्रही राहू शकत नाहीत. ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहणे, त्या बैठकीतील चर्चेत सहभागी होणे, गावच्या पुढाऱ्यांना प्रश्न विचारणे, यांसारख्या गोष्टी करणे त्यांना शक्य नाही.

ग्रामसभेच्या बैठकीची वेळ खेडेगावातील लोकांच्या दृष्टीने गैरसोयीची असते. ग्रामीण समाजातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असतो. ग्रामीण समाजातील अन्य व्यवसायही शेतीशीच निगडित असतात. म्हणून शेतीप्रधानता हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्टय सांगितले जाते. परंतु ग्रामसभेच्या बैठकींचे आयोजन मात्र गावातील लोक शेतीच्या कामात गुंतलेले असतात अशा वेळीच केले जाते. मुंबई ग्रामपंचायत नियम, १९५९ मध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, सरपंचाने व त्याच्या गैरहजेरीत

उपसरपंचाने ग्रामसभेच्या बैठकीचे आयोजन करताना ग्रामसभेचे सदस्य शेतीच्या कामात गुंतलेले नाहीत आणि बैठकीला उपस्थित राहण्यास मोकळे आहेत याची खात्री करून बैठकीची तारीख व वेळ निश्चित केली पाहिजे, परंतु प्रत्यक्षात मात्र सरपंच व उपसरपंच या गोष्टीचा गांभीर्याने विचार सहसा करीत नाहीत.

समारोप (Conclusion):

ग्रामसभेत गावातील प्रौढ नागरिकांचा समावेश होतो. यामध्ये अर्थातच स्त्रियाही येतात. म्हणजे ग्रामसभेचे जवळजवळ निम्मे सभासद गावातील महिला असतात, परंतु भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करता अद्यापही स्त्रियांचा राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सहभाग अत्यल्प असाच आहे. ग्रामीण समाजात तर ही गोष्ट आपणास प्रकर्षाने जाणवते. स्त्री-पुरूष समानतेविषयी कितीही चर्चा होत असली तरीही ग्रामीण समाजात आजदेखील स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते ही वस्तुस्थिती आहे, त्यामुळे ग्रामीण स्त्रिया राजकारणपासून दूरच राहणे पसंत करतात. ग्रामसभेच्या बैठकींना स्त्रिया सहसा उपस्थित राहत नाहीत. म्हणजे ग्रामसभा ही बहुतांशी पुरूषांचीच सभा ठरते. अपवादात्मक परिस्थितीत काही स्त्रिया एखाद्या बैठकीला उपस्थित राहिल्याच तर त्या चर्चेत कसलाही भाग घेत नाहीत. स्त्रियांची ग्रामसभेविषयीची उदासीनता हे तिच्या निष्क्रियतेचे आणखी एक कारण होय.

**संदर्भ ग्रंथ (Reference):-**

१. डॉ.सुधीर बोधनकर व विवेक आलोणी, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन नागपुर, जानेवारी २००७.

२. **Krishan Kumar Mor**, Gramsabha : Perspective & Challenges(2007) ISBN-8184290462

३. राम शेलकर, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८, अशोक ग्रोवर ॲण्ड कंपनी लॉ बुक सेलर्स ॲण्ड पाब्लिशर्स, पुणे, अकरावी आवृत्ती २०१२

४. मनोज आवाळे, पंचायतराज, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७

५. संजय खंडारे व शैला थोरवे, पंचायत राजसंस्था आणि विकासाच्या योजना, एक्सलन्स पब्लिकेशन्स, प्रथमवृत्ती, औरंगाबाद, २०१२

६. रा. गो. देवगावंकर, पंचायत राज आणि सामुहिक विकास, श्री साईनाथ प्रकाशन, प्रथमावृत्ती, नागपूर, २००७

७. व्ही. बी. पाटील, महाराष्ट्रातील पंचायतराज, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००९

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# अनुसुचित क्षेत्रातील ग्रामसभेचे महत्व :- पेसा कायदा
## (PESA :- पंचायात एक्सटेशन टु शेडयुल्ड ऐरिया)

**सहा. प्रा. सुनिता काशिनाथ जगताप,**
**समाजकार्य महाविद्यालय, नाशिक.**

**प्रस्तावना :-**

समाजाच्या मुख्य प्रवाहापासुन दुर असलेल्या आदिवासी भागातील नागरीकांच्या सांर्वागिण विकाससाठी आदिवासी भागाच्या सामाजिक, नैसर्गिक आणि भोंगोलिक संपन्नतेसाठी व संस्कृतीच्या जपणुकीसाठी पंचायत विस्तार (अनुसुचित क्षेत्र) अधिनियम (पेसा कायदा) म्हणजे आदिवासी जनतेसाठी आयुष्यात सकारात्मक परीणाम करणारी एक दृष्टिकोन आहे. ७३ व्या घटणादुरस्तीने १९९२ मध्ये भारतात झाली व पंचायत राज्यपध्दती सुरु झाली त्यातच महाराष्ट्रात १९५८ साली ग्रामपंचायतीचा कायदा केला गेला या कायद्याने प्रत्येक ग्रामसभा निर्मीण केल्या होत्या त्यांना ७३ व्या घटणादुरस्तीमुळे घटणात्मक दर्जा प्राप्त झाला पण बघावा तितका विकासात्मक बदल न दिसल्याने १६ ऑक्टोबर २००२ रोजी ग्रामपंचायत सुधारणा अध्यादेश काढला त्यात ग्रामसभांना अनन्य साधारण महत्व दिले ज्यात वर्षातुन ६ ग्रामसभा असाव्या महिलांना ग्रामसभेत घेणे बंधनकारक केले इत्यादी प्रकारचे विशेष अधिकार देण्यात आले.

आदिवासी स्वतंत्र संस्कृती, सामाजिकता, नैसर्गिक आणि भौगोलिकता यामुळे सर्व ग्रामसभा साठी असलेले नियमासंबधी अधिकार कार्य करण्याची पध्दती या वेगळ्या असणे गरजेचे असल्या करणाने आदिवासी बांधवानी सतत आंदोलन केले म्हणुनच **श्री दिलीपसिंग भुरीया** यांच्या अध्यक्षतेखाली खासदारांची समिती नेमण्यात आली. या समितीच्या शिफारशी नुसार २४ डिसेंबर १९९६ मध्ये लोकसभा व राज्यसभा यांनी आदिवासी स्वशासनाचा कायदा मंजुर केला त्यातील तरतुदी निहाय दिनांक २३ डिसेंबर १९९७ मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अनुसुचित क्षेत्रातील पंचायातीना स्वयंशासन करण्यासंबधीचे चा अधिकार प्रदान करुन समंती दिली या अधिनियमानुसार मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ या दोन्ही कायद्यात सुधारणा करुन हा कायदा आमलात आणल आहे.

**<u>नाशिक विभाग :- आदिवासी ग्रामसभा</u>**

भारतात पेसा कायदा १) महाराष्ट्रा २) आंध्रप्रदेश ३) गुजराथ ४) मध्यप्रदेश ५) झारखंड

६) छत्तीसगड ७) ओरीसा ८) राजस्थान ९) हिमाचल प्रदेश १०) तेलंगणा या राज्यांना पेसा कायदा लागु आहे. तर महाराष्ट्रातील १) अहमदनगर २) नाशिक ३) पुणे ४) ठाणे ५) धुळे ६) पालघर ७) अमरावती ८)जळगाव ९)यवतमाळ १०)नांदेड ११)गडचिरोली १२)चंद्रपुर या जिल्हामध्ये पेसा कायदा लागु आहे.

नाशिक विभागात नाशिक धुळे जळगाव नंदुरबार अहमदनगर या ५ जिल्हाचा समावेश आहे. या विभागात ८ तालुके संपुर्ण तर १३ तालुके अशंतः अनुसुचित क्षेत्रामध्ये येतात

नाशिक जिल्हा ग्रामपंचायत माहिती

| क्रमांक | तालुक्यांची नावे | पंचायत | गावे | पेसा लागु क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | पेठ | ७४ | २०१ | संपुर्ण तालुका |
| २ | सुरगाणा | ५८ | १८८ | |
| ३ | कळवण | ८७ | १८२ | |
| ४ | त्र्यंबकेश्वर | ८४ | १२५ | |
| | **एकुण** | **३०३** | **६९६** | |
| ५ | दिडोंरी | १२० | १५७ | अंशतः तालुका |
| ६ | इगतपुरी | ९६ | १२० | |
| ७ | नाशिक | ६४ | १३५ | |
| ८ | बागलाण (सटाणा) | १२९ | १८० | |
| ९ | देवळा | ४२ | ४६ | |
| | **एकुण** | **४५१** | **६३८** | |
| १० | निफाड | १२० | १३७ | --- |
| ११ | सिन्नर | ११४ | १२९ | |
| १२ | येवला | ८८ | १२५ | |
| १३ | मालेगाव | १२४ | १५४ | |
| १४ | नांदगाव | ८८ | ९३ | |
| | चांदवड | ९१ | ११२ | |
| | **एकुण** | **३०३** | **६९६** | |

नाशिक जिल्हात वरील १५ तालुके असुण पेठ, सुरगाणा, कळवण, त्र्यंबकेश्वर या चार तालुक्यात ( संपुर्ण ) पेसा कायदा लागु असुन दिडोंरी ,इगतपुरी, नाशिक ,बागलाण, देवळा या पाच तालुक्यात अशंतः पेसा **(PESA :- पंचायात एक्सटेशन टु शेडयुल्ड ऐरिया)**
कायदा लागु आहे.




## आदिवासी स्वशासन कायद्याचा हेतु

पेसा कायद्यामुळे आदिवासी भागातील ग्रामसभा व ग्रामपंचायतीना इतर ग्रामपंचयाती पेक्षा अधिकार देण्यामागील प्रमुख भुमिका पुढिलप्रमाणे:-

### ७३ व्या व ७४ व्या घटणादुरस्तीचे परीस्थीती




१) आदिवासी जनजातीच्या पंरपंरा आणि रुढी हा त्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

२) सामुहिक साधनसामुग्री हा त्यांच्या उपजिवीकेचा मुख्य भाग आहे.

३) आदिवासी सांस्कृतीक वैशिष्टे व जिवनशैली वेगळी आहे.

४) अदिवासी चा विवादाचा निर्णय करण्याची रुढ पध्दती त्यांचे पालन करण्याची पंरपरा अद्याप कायम आहे.या सर्व बाबींचे संरक्षण व जतन करण्यासाठी ( २(८ अ) पोट कलम १) ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य कायद्याने दिले आहेत.

अनुसुचित क्षेत्रातील पेसा कायद्याचे महत्व

नाशिक जिल्हातील ५५ % क्षेत्रात ( २२% संपुर्ण पेसा कायदा ग्रामपंचायतीनां लागु + ३३ % अशंत: पेसा कायदा लागु असतांना ग्रामपंचायत वास्तव्य करण्या आदिवासी बांधवांना स्वयंसिध्द करण्याचा प्रयत्न या पेसा कायद्याच्या निर्मीतीमागे असुन शहरी भागाच्या तुलनेने येथिल जनतेला अमर्यादित अधिकार

देण्यात आले आहेत. त्यामुळै त्यांचे अनुसुचित क्षेत्रात ग्रामसभेचे महत्व अधिक आहे.

१) राज्यात अदिवासी, ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी एक गाव आणि बारा वाडया, पाडे, वस्ती, अशी रचना पहायला मिळते, त्यामुळे एखाद्या छोटया वाडी-पाडे, वस्तीतील लोकांना गावाची स्वतंत्र गाव म्हणुन नोंद करुन घ्यावी वाटली तर त्याची सुविधाही उपलब्ध झाली आहे (या साठी ५०% मतदारांच्या मागणीने तसा अर्ज करुन हे करताता उदा. गडचिरोली जिल्हातील मेढा लेखा हे गाव)

२) पेसा कायद्यानुसार सबधित गावामध्ये एखादी गावामध्ये योजना राबविणे प्रकल्प किंवा कार्यक्रम हाती घेणे शासणाच्या निधीचा विनीयोग करणे विविध योजनासाठी लाभार्थी निवड, मादक द्रव्य विक्री किंवा सेवन प्रतिबंध या सर्व गोष्ठीसाठी ग्रामसभेचे मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

३) आदिवासी भागातील नागरीकांना सर्वात महत्वाचा अधिकार मिळाला तो म्हणजे त्यांच्या विविध प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीबाबत तसेच जमिनीबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य ग्रामपंचायतींना मिळाले.

४) गावात काही विकास प्रकल्प असतील किंवा धरणे असतील यामध्ये विस्थापणे व्हावे लागणा-या नागरीकांपैक्ी बहुतांश जणांचा या गोष्टिला विरोध असतो. मात्र्, त्यांचा विरोध डावलुनही ते प्रकल्प उभे राहतात या कायद्यानवे गावासाठीचे योजना व प्रकल्पाकरीता सर्व ्ग्रामसभांची मान्यता मिळवणे बंधनकारक करण्यात आली आहे.

५) जलस्त्रोत, सिंचन, खाण खजिने आणि गौण वनोत्पादन यांचे व्यवस्थापण हेही ग्रामसभेकडे विहित करण्यात आले आहे. त्यावर कोणाचीही वयैक्तीक मालकी नसणार आहे.

६) अनुसुचित जमातीतील व्यक्तींची कोणतीही जमीन बिगर आदिवासीकडे बेकायदेशीर हस्तांतर होणार नाही, याची ग्रामसभा सुनिश्चित करेल.

७) ग्रामसभेना त्यांचा कारभार चालविण्यासाठी तयार केलेल्या विविध समित्यांवर ५०% स्त्रियांना प्रतिनिधीत्व देण्याचा नियम यामध्ये करण्यात आला आहे.

८) आदिवासी स्वशासन असलेल्या भागात ग्रामसभेच्या निर्णयाची अमंलबजावणी पंरपरागत गाव पंचाव्दारे होते.

९) आदिवासी जिवनाची पंरपरा आणि रुढी , त्यांची सांस्कृतीक वैशिष्टयामुळे सामुहिक साधनसामुग्री आणि विवादांचे निराकरण करण्याची पंरपरागत पध्दती यांचे जतन करणे.

१०) सामाजिक व आर्थिक विकासासाठी पंचायतीना आमलात आणावयाच्या योजना हाती घेण्यापुर्वी ग्रामसभेची मान्यता द्यावी

११) गावा क्षेत्रामध्ये गाव बाजार स्थापणा करण्यास करण्यासाठी व त्यांचा व्यवस्थापणांची ग्रामसभेने बहुमतांने घेतलेल्या कोणताही निर्णय हा पंचायतीवर बंधनकारक राहील.

१२) झाडे तोडण्या, पाडण्याबाबत ग्रामपंचायती मार्फत संबधित अधिका-यांना शिफारशी करणे.

१३) पंचायतीसाठी असलेल्या अर्थसंकल्पांना मान्यता देणे.

१४) जनजाती उपाययोजना सह, स्थानिक योजनावर व अशा योजनांचा साधनसंपत्तीवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने ग्रामपंचायतली शिफारस करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.

१५) संबधित गावामध्ये सामाजिक क्षेत्रातील कार्यक्रमांची अंमलबजावणी सोपवलेल्या संस्थांचा व पददाधिकारांच्य प्रगतीची सह नियंत्रण करण्यास व त्यांच्या कार्यीचे परीवेक्षण करण्यास पंचायत समितीने जिल्हा परीषदाना यांना योग्या त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल.

१६) जेथे अनुसुचित जमातीची लोकसंख्या एकुण लोकसंख्येंचा ५० % हुन अधिक असले अश्या अनुसुचित क्षेत्रामध्ये अश्या पंचायतीच्या अध्यक्ष अनुसुचित जमातीचा असेल.

१७) सावकारीसाठी कोणतेही लायसन्स देण्याकरीता मुंबई सावकार अधिनियम १९४६ अन्वये नियुक्त केलेल्या निंबधकाला कोणतीही शिफारस करण्यास सक्षम असेल तसेच ग्रामसभेने घेतलेल्या कोणताही निर्णय हा अधिका-यावर बंधनकारक असेल प्रत्येक पंचायत निबंधकाला कोणतेही शिफारस करणेपुर्वी ग्रामसभेशी विचार विनिमय करेल.

२० वर्षापुर्वी तयार करण्यात आलेल्या या कायाद्याची अद्याप पुणपुने माहिती आदिवासी भागातील नागरिकांना नाही. या कायद्याने त्यांना मिळालेल्या अधिकारांची जाणिव त्यांना नाही. त्यामुळे या कायद्याचा प्रचार व प्रसार करणे तितकेच आवश्यक बनले आहे. या कायद्याची अमंलबजावणी झाल्यास निश्चितच आदिवासी ग्रामपंचायतीसाठी हा कायदा वरदान ठरेल.

आदिवासीच्य परंपरा रुढी यांची सांस्कृतीक ओळख आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची त्यांचे अधिकार यांची जपवणुक करण्याची जी हमी घटणेच्या पाचव्या अनुसुचिमध्ये देण्यात आली आहे. ती आणि त्यांचा स्वशासनाचा हक्क यांचा संगम आहे.

**संदर्भ सुची**

१) www.opard.gov.in

२) http :// apardkeycop.nic.in

३) जिल्हा परीषद नाशिक माहिती पुस्तीका

४) नांदेडकर व्ही. जी. (२०१२) पंचायत राज : एक विश्लेषणात्मक परामर्श, के सागर पब्लीकेशन, पुणे

५) महाराष्ट्र शासण राजपत्र reg no. mh/mr/south-३३९/२०१४-१६) दि. ०४/०३/२०१४.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# ग्रामसभा :- ग्रामीण विकासातील आणि राजकारणातील भूमिका

**प्रा. प्रोटे अभिन संपत ,**
**राज्यशास्त्र विभाग,**
**कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**निफाड.**

**प्रस्तावना :-**

ग्रामसभेला लोकशाहीचा कणा असे म्हंटले जाते. ग्रामसभा ही ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात महत्वाची भूमिका बजावते. तरीही ग्रामसभेच्या या कार्यात अनेक समस्या निर्माण होतात. उदा. गरीबी, वाढती लोकसंख्या, अशिक्षितपणा, चुकीचे व्यवस्थापन इ. मुळे ग्रामीण विकासाच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतो व यासाठी ग्रामसभा नियमित घेणे किती अनिवार्य आहे हे लक्षात येते.

खेड्याकडे चला हा मुलमंत्र देवुन गांधीजींनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे स्वागत केले व तसाठी नियमित ग्रामसभेचे महत्वही पटवुन दिले. कारण ग्रामसभेच्या माध्यमातुन आदिवासी शेतमजुर, ओ.बी.सी. समाज यांना ग्रामीण राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. ग्रामसभेला गावच्या स्थानिक कारभारात विशेष स्थान देण्यात आले. प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. ग्रामसभेत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रौढ नागरिकांचा समावेश होतो. राज्यघटनेच्या कलम (२४३ अ) मध्ये ग्रामसभेचा उल्लेख आहेत. ग्रामसभेमुळेच व्यक्तीचा ग्रामीण विकासावर व राजकीय भूमिकोवर प्रभाव पडतांना दिसतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

ग्रामसभेत जनसहभग कमी असण्याच्या कारणांचा शोध घेवुन त्यावरील उपाय योजनांचा आढावा घेणे.

**संशोधन विषयाची गृहितकृत्ये :-**

ग्रामसभेत जनसहभाग खूपच कमी असल्याचे दिसते.

**संशोधन विषयाचे महत्व :-**

ग्रामीण जीवनाला ग्रामसभेच्या रुपाने प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार घडतो. प्रत्यक्ष लोकशाहीत सर्व लोक राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात. त्यामुळे लोकांच्या इच्छा आकाक्षांना मूर्त रुप प्राप्त होते. लोकांच्या राजकीय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागामुळे राज्यकर्त्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण येते व त्यामुळे ते सत्त्ेचा दुरुपयोग करु शकत नाही व एकुणच त्यांचा संपुर्ण राजकारणावर प्रभाव पडतो.

ग्रामपातळीवर ग्रामसभेच्या माध्यमातुन गावातील सर्वच प्रौढ नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करुन घेता येते. ग्रामसभा बैठकीमध्ये गावातील सर्व आपल्या प्रतिनिधींना म्हणजेच ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना प्रश्न विचारु शकतात. त्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवू शकतात. तसेच त्यांना निरनिराळी लोकोपयोगी विकास कार्य करण्याविषयी मार्गदर्शन करु शकतात व त्याकरीता ग्रामीण भागातील जनतेचा ग्रामसभेत जनसहभाग वाढणे खूप गरजेचे आहे.

**संशोधन पद्धती :-**

ग्रामसभेतील जनसहभाग कमी असण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय तथ्ये सामुग्रीचा आधार घेण्यात येईल. त्यामध्ये प्रस्तुत विषयाच्या संदर्भातील ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहेत. विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेण्यात येईल.

**संशोधन विषयाचे विश्लेषण :-**

७३ व्या घटना दुरुस्तीने ग्रामसभेला मोठया प्रमाणात अधिकार प्राप्त झाले. गावात महत्वाची विकास कामे सुरु करण्याचा आणि त्या संबंधी खर्चाला मंजुरी देण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला प्राप्त झालेला आहेत. ग्रामसभेमुळे गावच्या कारभारावर गावचा अंकुश राहतो. ग्रामसभेमुळे आपल्याकडे आपले गाव पाहत आहे याची जाणीव ग्रामपंचायत सदस्यांना सदैव राहते. ग्रामपंचायतीच्या कारभारातील भ्रष्टाचार नष्ट करुन तिचा कारभार पारदर्शी करण्याचे कार्ये ग्रामसभा करीत असते. गावात समता, न्याय प्रस्थापित करणारी, ग्रामपंचायतीला नैतिक अधिष्ठन प्राप्त करुन देणारी एक जबाबदार, कार्यक्षम संस्था म्हणुन ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले म्हणून ग्रामसभा म्हणजे गावाची लोकसभा असे जेष्ठ समाजवादी नेते एस.एम. जोशी यांनी म्हंटले आहेत. असे असले तरी पण ग्रामसभेला जनतेचे सहकार्य व प्रतिसाद पाहिजे तेवढया प्रमाणात मिळत नाहीत. याचा सविस्तर व सखोल विचार केला असता खालील कारणे आढळुन येतात.

**ग्रामसभेत जनतेचा सहभाग कमी असण्याची प्रमुख कारणे :-**

१) ग्रामीण भागातील सामान्य जनता, राजकारणाविषयी उदासीन असते. श्रीमंत, शक्तीशाली लोकांचा वरचष्मा अधिक असतो. त्यांच्या दादागिरी समोर सामान्य जनता/ग्रामस्थ बोलु शकत नाही.

२) अज्ञान, निरक्षरता यामुळे सामान्य जनतेला ग्रामसभा, ग्रामपंचायत यांचा कारभार याविष्यी अज्ञान असते.

३) गावा-गावातील राजकारणावर विशिष्ट श्रीमंत, धनदांडग्या लोकांचा विशेष प्रभाव असतो. राजकारणातील गट तट असतात. राजकारण हा श्रीमंत लोकांचा व्यवसाय आणि खेळ बनतो. त्यामुळे सामान्य जनता निमुटपणे कोणत्या तरी एका गटाच्या मागे उभी राहते किंवा गावच्या राजकारणापासुन अलिप्त राहते.

४) शेतीची कामे, रोजगार, पोटापाण्याचा व्यवसाय यांत गुंतलेले शेतकरी, शेतमजुर, नागरिक ग्रामसभेच्या बैठकांना उपस्थित राहु शकत नाही.

५) गावातील स्त्रिया ग्रामसभेच्या निम्या प्रमाणात सदस्य असतात. परंतु त्या ग्रामसभेच्या बैठकांना हजर राहत नाही. ग्रामसभेबाबत स्त्रीयांची उदासिनता जाणवते. त्यामुळे ग्रामसभेचे स्वरुप पुरुष प्रधान बनते.

६) ग्रामसभेच्या बैठकींना सरपंच, उपसरपंच हे पदाधिकारी गैरहजर राहतात व त्याचा परिणाम ग्रामविकासावर होतो.

७) ग्रामसभेत ज्या गटाचे वर्चस्व आहेत. त्या गटाचेच लोक ग्रामसभेला उपस्थित राहतात. विरोधी पक्षाचे लोक, कार्यकर्ते ग्रामसभेला गैरहजर राहतात.

८) ग्रामपंचातीच्या क्षेत्रातील नागरिक राजकीय दृष्टया जागरुक नसतात. त्यांच्यात राजकीय जाणीव जागृती आणि जबाबदारी फार कमी असते.

९) ग्रामीण समाजात आज देखिल जाती व्यवस्थेचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसुन येतो. कनिष्ठ जाती समुहातील लोक आपल्या राजकीय हक्काबाबत फारसे आग्रही असतांना दिसत नाही.

१०) ग्रामसभेत नेहमी गोंधळ सदृश्य परिस्थिती असलने ग्रामस्थ ग्रामसभेत सहभागी होणे टाळतात.

**ग्रामसभेत जनतेचा सहभाग वाढला जावा या करीता उपाययोजना :-**

१. सामाजिक व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी व चर्चेत सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

२. ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहण्याची मानसिकता ग्रामसभेत महत्व, त्याबाबत जाणीव जागृती गावातील जनतेत निर्माण करावी.

३. ग्रामसभेत गटा-तटाचे राजकारण न करता सामान्य जनतेच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक लक्ष देवुन त्यावर उपाययोजना कराव्यात.

४. गावातील लोकांच्या दृष्टीने सोयीची वेळ पाहुन ग्रामसभेच्या बैठकीचे आयोजन करावे.

५. गावातील जनतेला ग्रामसभेचे महत्व पटवुन देवुन उपस्थित राहण्याबाबत त्यांच्यात मानसिकता निर्माण करावी.

६. गावातील सरपंच-उपसरपंच ग्रामसेवक विविध पदाधिकारी यांच्यावर ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे बंधन घालावे.

७. ग्रामसभा सर्व नागरिकांकरीता असल्याने तेथे कोणतेच वाद, गट असु नयेत.

८. ग्रामसभेच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची ग्रामपंचायतीने प्रामाणिकपणे दखल घ्यावी. निर्णयांची अंमलबजावणी होत असते हे लक्षात आल्यानंतर लोकांचा सहभाग व उत्साह वाढेल.

९. गावातील सर्व जाती-समुहातील लोकांना राजकीय हक्क समान आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या मनाचा आदर व विचार

केला पाहिजे.

१०. ग्रामसभेच्या बैठकीच्या सुरुवातील किंवा अखेरिस सिनेमा नाटक यांसारख्या करमणूक प्रधान कार्यक्रमांचे आयाजन करावे.

**निष्कर्ष :-**

ग्रामसभेला प्रभावी बनविण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे सर्व सामान्य लोकांमध्ये सामाजिक व राजकीय प्रश्नांवर जागृती निर्माण करणे होय. अशा गोष्टींच्या विळाख्यातुन आपोआप बाहेर पडतील व आपल्या व समाजाच्या दृष्टीने मुलभूत प्रश्न कोणते याची जाण त्यांच्या ठिकाणी निर्माण होईल. थोडक्यात, सामान्य लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणातून ग्रामसभेसारख्या संस्थांना बळकटी प्राप्त होईल. ग्रामसभेला प्रभावी बनविण्यासाठी कायद्याच्या मार्गाचा अवलंब करणे ही उपयुक्त ठरेल. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी ग्रामसभेला जबाबदार राहतील. अशी व्यवस्था केली तर ग्रामसभेतील जनसहभाग वाढण्यास मदत होईल.

**समारोप :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ सक्षम होण्यासाठी महात्मा गांधीनी ग्रामीण भागातील सर्व स्तरावरील लोकांना सामावुन घेतले. पंचायत राज यशस्वीतेसाठी गांधीजींचे ग्रामराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसभा सक्षम करणे गरजेचे आहेत.

वास्तविक ग्रामपंचायती म्हणजे - लोकशाहीच्या शाळा आहेत. या शाळामध्ये कोणते शिक्षण मिळते यावर देशातील लोकशाहीची निकोपता अवलंबुन असते. भ्रष्ट लोक प्रतिनिधींना सत्तेवरुन दूर करण्याचा अधिकार ग्रामसभेद्वारे लोकांना मिळत आहे. ही निश्चित स्वागतार्ह गोष्ट आहेत व म्हणूनच ग्रामसभेचा ग्रामीण विकासातील आणि राजकारणातील भूमिका अत्यंत मोलाची आहे.

**संदर्भ :-**

१) व्ही.बी. पाटील, महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, केसागर पब्लिकेशन्स, पुणे-२००५.
२) बी.बी. पाटील, महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर, नोव्हेंबर-२००५.
३) सामान्य क्षमता चाचणी, के सागर पब्लिकेशन्स-लिखित, पुणे-२०१०.
४) मधुसुदन पेडणे, नवनीत जनरल नॉलेज, नवनीत पब्लिकेशन्स पुणे-२००८.
५) बी.आर. जोशी, राज्यशास्त्र कोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-२००७.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# राजकारण व ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका

**प्रा. भागवत शंकर महाले,**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख,**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, ताहाराबाद,**
**ता. सटाणा, जि. नाशिक**

## १. प्रस्तावना-

भारताच्या पंचायतराज व्यवस्थेत सर्वोच्च सभा म्हणजे ग्रामसभेला महत्वाचे स्थान आहे. ग्रामसभेलाच प्रत्यक्ष लोकशाहीचा आविष्कार म्हणून ओळखले जाते. ग्रामसभेत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रौढ नागरीकांचा समावेश होत असतो. ग्रामसभेच्या माध्यमातून गावतील सर्व प्रौढ नागरीकांना राजकीय प्रकीयेत गावाच्या कारभारात ग्रामपंचायतीच्या प्रशासनात सहभागी होण्याची संधी मिळते. भारतीय राजघटनेने पंचायत राज व्यवस्थेचे महत्व म्हणून ७३ व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेत पंचायती हा नवा भाग नव्याने समाविष्ट केलेला आहे. या भागातील कलम २४३(अ) मध्ये ग्रामसभेचा उल्लेख केलेला आहे. कायदेमंडळ कायद्यानुसार ग्रामसभेचे गावपातळीवर अधिकारांचा वापर निश्चित केलेला आहे. म्हणून ग्रामसभा एक विशेष सभा म्हणून ओळखली जाते.

## २. ऐतिहासिक पार्श्वभूमी-

राजकीय व्यवस्थेत जनतेचा जास्तीत जास्त सहभाग असणे लोकशाहीमध्ये अपेक्षीत असते. लोकशाही म्हणजे **लोकांचे लोकांसाठी लोकांनी चालविलेले शासन,** अशी अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या केलेली आहे. लोकशाहीत जनतेची इच्छा ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. शासनाची धोरणे आणि कार्यक्रम जनतेच्या इच्छेनुसार ठरविले पाहिजेत. तसेच राजकीय सत्तेत आणि निर्णय प्रकियेत लोकांचा अधिकाधिक सहभाग असला पाहिजे. हे लोकशाहित अभिप्रेत असते.

भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व स्विकारुन केंद, राज्य व स्थानिक पातळीवर सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वात स्थानिक स्वराज्य संस्थांचा उल्लेख केलेला आहे. त्यानुसार ४० व्या कलमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर कार्य करणाऱ्या संस्था निर्माण करण्यात आल्या. ग्रामीण पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक दर्जा मिळवून देण्यासाठी १९९२ रोजी ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. यानुसार भारतातील सर्व राज्यांप्रमाणे महाराष्ट्राने देखील

जिल्हापातळीवरील जिल्हापरिषद ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायत व तालुका पातळीवर पंचायत समिती अशी त्रिस्तरीय रचना स्थानिक पातळीवर निर्माण केली.

**३. ग्रामसभेची उद्दीष्टे-**

१. गावपातळीवर स्थानिक सरकार म्हणून काम पाहण्यास सक्षम बनविणे.

२. ग्रामीण भागातील स्थानिक पातळीवरील प्रश्न, समस्या स्वतः गावकऱ्यांनी सोडविण्यास मदत करणे.

३. गावातील लहान सरकार म्हणून गावपातळीवर ग्रामसभा ग्रामपंचायतीला मदत करणे.

४. स्थानिक पातळीवरील गावांचा विकास झपाट्याने होण्यास नागरीकांचा सहभाग वाढविणे.

५. जनतेचे प्रश्न जनतेनेच सोडविण्यास प्रोत्साहित करणे.

**४. ग्रामसभेचे महत्व**

भारतीय राज्यघटनेने ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभेचे महत्व अधोरेखित केले आहे. ग्रामसभेत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व १८ वर्षावरील नागरीक मतदार हे सदस्य असतात. त्यांच्याकडून ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड होते. त्यामुळे ग्रामसभा म्हणजे गावातील सर्व मतदारांची सर्वसाधारण सभा आणि ग्रामपंचायत म्हणजे ग्रामसभेची कार्यकारिणी असते. ग्रामसभेत सर्व व्यक्तींना विकास योजनांसंबंधी मत मांडण्याचा अधिकार असतो.

१) **ग्रामसभेच्या बैठकी**:

प्रत्येक आर्थिक वर्षात म्हणजेच १ एप्रिल ते ३१ मार्च या दरम्यान ग्रामसभेच्या किमान २ बैठका घेतल्याच पाहिजे अशी तरतुद आहे. ग्रामसभेच्या बैठकांचे नियम, ठिकाण, वेळ, पध्दती , अध्यक्ष इ. विषयी स्पष्ट उल्लेख सभेच्या नोटीसमध्ये असला पाहिजे. बैठकीच्या निदान ७ दिवस अगोदर नोटीस दिली पाहिजे. ग्रामसभेच्या इतर २ सभा १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी घेतल्या जातात.

२) **गणसंख्याः**

ग्रामसभेच्या गणपुर्ती साठी मतदारांच्या यादीत समाविष्ट असलेल्यांपैकी १५ टक्के किंवा १०० मतदार यापैकी जी संख्या कमी असेल तितकी उपस्थिती आवश्यक मानली जाते.

**५. ग्रामसभेचे कार्यः**

**१. ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवणे :**

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

ग्रामसभा हे पंचायत राज्याचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. गावाचा कारभार हा गावाच्या हाती असणे म्हणजे केवळ ग्रामपंचायतीच्या हाती नसुन त्या ग्रामपंचायतीवर देखरेख व नियंत्रण ठेवणाऱ्या ग्रामसभेच्या हाती आहे.

**२. ग्राम विकास :**

ग्रामसभेत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेता येतात. प्रत्येक कार्यात ग्रामसभेला वेळोवेळी सामिल करुन घेउन पंचायतीला गावाचा विकास चांगल्याप्रकारे करता येणे शक्य आहे. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांशी सर्व गावकरी एकत्र येवून ठाम राहिले तर त्याला विरोध करणे कोणालाही शक्य होणार नाही.

**३. विविध घटकांचा समावेश :**

ग्रामसभेत गावातील तरुण व महिला यांना सहभागी करुन घेतले जाते. पंचायतीत महिलांना केवळ एक तृतीयांश राखीव जागा असतात. परंतु ग्रामसभेत हक्काने समान जागा उपलब्ध होतात. तसेच स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे , सहकारी संस्था यांचा सहभाग महत्वाचा ठरतो.

**४. मार्गदर्शन करणे :**

वेगवेगळ्या क्षेत्रातील मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांना ग्रामसभेत निमंत्रण दिले जाते. तज्ञांचे मार्गदर्शन नागरिकांना होण्यासाठी ग्रामसभा भूमिका पार पाडते.

**५. विविध समित्यांची नियुक्ती :**

गावाच्या विकासासाठी गावपातळीवर वेगवेगळया समित्या ग्रामसभेतच निवडल्या जावू शकतात. त्यामुळे नागरिकांमधील मतभेद न होता सर्वानुमते निर्णय घेतले जातात.

**६. विविध निर्णय घेणे :**

ग्रामसभेत वार्षिक जमाखर्च, पथक मागील कामकाजाचा अहवाल, चालु वर्षातील कामे व इतर आवश्यक त्या विषयांवर विचार करुन विशेष निर्णय घेतले जातात.

**७. पंचायत राज्याचा आधारस्तंभ:**

शेवटी ग्रामसभा हाच पंचायत राज्याचा महत्वाचा आधार आहे. हे लोकांनी लक्षात घ्यायला हवे. गावाच्या पातळीवरील प्रश्नांची जबाबदारी गावातील व्यक्तींवरच सोपविली पाहिजे, तरच त्यांना कारभाराची सवय होईल व ग्रामसभेलाही लोकाभिमूख करता येईल. आणि त्यामुळे योग्य विकास करणे शक्य होईल.

इत्यादी महत्वपूर्ण कार्य ग्रामसभेत केले जातात.

**६. निष्कर्ष व उपाय:**

१ ग्रामसभेमुळे आमच्या गावात आम्ही सरकार याची लोकांना अनुभूती येते, म्हणून ग्रामसभा महत्वाची आहे.

२ पंचायत राज्यव्यवस्थेत ग्रामसभा सर्वोच्च आहे. मात्र प्रत्यक्षात ग्रामसभेच्या अधिकाराला व कार्याला प्रचंड मर्यादा निर्माण झाल्याचे दृष्टोत्पतीस आलेले आहे.

३ ग्रामसभेच्या बैठका नियमित होत नाहीत. त्यांची कागदोपत्री नोंद केली जाते.

४ ग्रामसभा ही काही ग्रामविकासाचे काम करु शकते, यावर जनतेचा विश्वास दिसत नाही.

५ आजही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात उच्च जाती व श्रीमंताचे वर्चस्व आहे.

६ गावातील राजकारण हे गटागटाने विभागलेले असल्याने आपला निभाव लागणार नाही असे सामान्य नागरिक, स्त्रिया, अल्पसंख्यांक समाजाला खात्री आहे, म्हणून ग्रामसभेला उदासिनता दिसते.

७ समाजातील निरक्षरता अज्ञान आणि दारिद्य लोकांना पोटापाण्याचा प्रश्न आदिंमुळे ग्रामसभेच्या कामकाजाविषयी उदासीन बनवते. म्हणुन ग्रामसभेच्या स्तंभाला मर्यादा निर्माण झालेल्या आहेत.

**संदर्भ:**

१ महाराष्ट्राचे शासन व राजकारण- डॉ. खांदवे एकनाथ, आरती प्रकाशन, नगर

२ भारताचे शासन व राजकारण- प्रा.भोळे भास्कर

३ महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष- प्रा.पळशीकर सुहास, प्रा.कुलकर्णी सुहास, पुणे

४ महाराष्ट्र शासन आणि राजकारण- प्रा. पाटील बी.बी. , कोल्हापुर

५ दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाईम्स

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# प्राचीन पंचायतराज मधील ग्रामसभांची वाटचाल

**प्रा. नितीन कारभारी जाधव,**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख,**
**के.जी.डी.एम. महाविदयालय,**
**निफाड. जि. नासिक.**

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळात सर्व सुखसंपन्न गावांचा उल्लेख इतिहास कारांनी केला आहे. ग्रामीण जीवन शैलीत गुणात्मक स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणण्याची जबाबदादारी प्राचीन कालखंडा पासून पंचायतराज संस्थानी पार पाडली आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या सामाजिक, आर्थिक व भौतिक स्थितीत सुधारणा घडवुन आणण्याची जबाबदारी ग्रामसंस्थानी स्वीकारली. म्हणूनच प्राचीन ग्राम जीवन स्वयंपूर्ण होते. परंतु कालखंडा नुसार या ग्रामसंस्थांची स्थिती, अधिकार आणि भूमिका यात मोठे बदल झालेले दिसुन येतात. समाज मान्य असे नियम प्राचीन ग्रामसंस्थानी विकसित केले. त्यात मानवी समाजाच्या विकासा बरोबर परिवर्तन होत गेले.

**संशोधनाची उद्दीष्टे :-**

प्राचीन पंचायतराज मधील ग्रामसभांच्या वाटचालीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्राचीन पंचायतराज मधील ग्रामसभांच्या वाटचालीचा आढावा घेण्यासाठी प्रस्तूत संधोधन विषयाच्या संदर्भातील संदर्भग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे.

**प्राचीन पंचायतराज व्यवस्था व ग्रामसभांची वाटचाल विश्लेषण**

वैदीक कालखंड पंचायत राजचा सुवर्ण कालखंड मानला जातो. कारण वैदिक कालखंडात गावाचा कारभार ग्रामसभा पहात होती. गावाच्या समस्यांबाबत लोक एकत्र बसून निर्णय घेत. म्हणूनच या काळात अनेक ग्रामीण लोकप्रातिनिधीक संस्थाचा उदय झाला, प्राचीन काळापासुन एकसंघ, ग्रामीण, समाज, आणि त्यावर नियंत्रण करणारी यंत्रणा यांचे अस्तित्व दिसून येते. तत्कालीन वैदिक काळात ज्या संस्था

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

अस्तित्वात होत्या. त्या आजच्या ग्रामसभां सारख्याच कार्ये करीत होत्या.

सभा दैवी सिध्दांतावर आधारित स्थापित झालेली लोकप्रातिनिधीक संस्था होती. राज्याला मदती साठी सभा ही महत्वाची ग्रामसंस्था असे. सार्वत्रिक विचार विनिमय करण्यासाठी गावातील जेष्ठांची सभा म्हणजे सभा होय. विविध प्रश्नावर विचार विनिमया बरोबरच करमणुक व न्यायदानाचे कार्य सभा करत असे, सभेच्या प्रमुखाला सभापती किंवा ग्रामणी म्हटले जात. या वरून न्यायदान करणारी पंचायत हे सभेचे प्रमुख स्वरूप होते. सभेमध्ये वयोवृध्द, अनुभवी, कुलीन, प्रतिष्ठीत, निपक्षपाती सभासदांचा समावेश केला जात असे. ही सभा प्रजेच्या व गावाच्या विविध प्रश्नावर चर्चा करून योग्य तोडगा सुचवीत असे, परंतु हा तोडगा राजावर बंधन कारक नव्हता. सभा वस्तुत: सामाजिक आणि राजकीय विषयावर विचार करणारी ग्रामसंस्था होती.

समिती ही वैदिक काळातील दुसरी महत्वाची लोकप्रातिनिधीक संस्था होय. समितीत सर्व वर्ण, जाती, जमाती चे सभासद होते. ही जनतेच्या प्रातिनिधीची आमसभा होती परस्परांच्या सहकार्याने समितीचे कामकाज चालत. कायदा न्याय, संरक्षण, प्रशासन, धर्म, अर्थ इत्यादी बाबत चर्चा करून निर्णय समितीत होत. मात्र हे निर्णय राजावर बंधन कारक नव्हते. राजा सहसा समितीच्या निर्णयास विरोध करित नव्हता. प्रसंगानुरूप भ्रष्ट व स्वैरवर्तनी राजाला पदच्युत करण्याचा अधिकार समितीस असल्याने राजसत्तेवर तिचा वचक होता. म्हणजेच सभा व समिती या राजसत्तेवर नियंत्रण ठेवणाऱ्या ग्रामसंस्था प्राचीन काळात महत्वपूर्ण होत्या.

खेडयातील न्यायाधीशाना ग्राम्यवादीन म्हणत. सभा या ग्रामसंस्थेत न्यायदानाचे कार्य ग्राम्यवादीन पार पाडत असे. गंभीर प्रश्नावर चर्चा करून निर्णय घेणे, अपराधिस त्यांचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य ग्राम्यवादीन देत असे. म्हणजेचे ग्राम्यवादीन पंचाची भूमिका पार पाडत असे.

ग्रामणी म्हणजे ग्रामाचा मुख्य होय. खेडयाचा कारभार ग्रामणी व ग्रामसभा चालवत असे. ग्रामणी हा ग्रामाचा प्रमुख सत्ताधीश होता. त्याच्यावर खेडयाच्या संरक्षणाची व लोकांच्या कल्याणाची जबाबदारी होती. खेडयाचा कारभार वैदिक काळात ग्रामणी पहात होता. ग्रामणीला महाराष्ट्रात पाटील (पट्टकीला) किंवा ग्रामकुट, कर्नाटकात गावुंड, आंध्रात मुमुंडा, तामिळनाडूत पेरूमुकुल, उत्तरेत ग्रामणी किंवा महत्तर अशी नावे होती. प्रत्येक खेडयासाठी एकच ग्रामणी असत. ग्रामणीची निवड सुरूवातीस जनतेकडून नितीमान व सदाचरणी व्यक्तीतुन केली जात असे पुढे वंशपरंपरेने निवड होउ लागली. ग्रामसंरक्षणाची जबाबदारी असल्याने अब्राम्हण क्षत्रियाची हया पदासाठी निवड करीत. गावात शांतता राखणे, जमीन महसुल गोळा

करणे इत्यादी अधिकार ग्रामणीस असत. त्याला सल्ला मसलत देण्याकरिता खेडयातील प्रमुख गृहस्थांची एक समिती असे प्रत्येक कुटुंब प्रमुख या ग्रामसभेचा सभासद असे.

खेडयातील जातीवर आधारित प्राचीन ग्रामसंस्था म्हणजे गोतसभा होय. आपापल्या जातीच्या लोकांचे तंटे सोडविणे, जाती संस्थाचे रूढी व नियमाचे पालन करून घेणे, रोटी-बेटी व्यवहारा बाबतचे प्रश्न सोडविणे, स्वजातीचे रक्षण करणे व आपापल्या जात बांधवाच्या उन्नतीचे प्रयत्न करणे हे काम गोतसभा करीत असे. वैदिक काळातील गावातील या संस्था ग्रामीण सुव्यवस्था व रक्षण करण्याबरोबरच स्वयंपुर्ण देखील होत्या.

दक्षिण भारतातील चोल कालखंडातील 'ग्रामसभा' ही वैशिष्टयपूर्ण संस्था आहे. चोल कालख्ंडात ग्रामसभेला अग्रहार सभा, महाजनसभा, महासभा, पेरूगुरी, वारियामी, महत्तरधिकरणी अशा विविध नावाने ओळखले जात असे. तसेच ग्रामसभेतील सभासदाना वारीया पेरूमक्कल म्हटले जात. ३५ ते ७० वर्ष वय असलेल्या व स्वमालकीची जमीन असणारे लोक ग्रामसभेच्या कार्यकारी समितीवर निवड होत असे. ग्रामसभा गावचा कारभार कार्यकारी समिती मार्फत पाही. कार्यकारी समितीच्या ३० सभासदांची निवड विविध क्षेत्रातुन लोकशाही पध्दतीने केली जात असे. एका वर्षा साठी ३० सदस्य निवडले जात. त्यानंतर ३ ते ५ वर्ष फेर निवडीस ते पात्र ठरत नसे. या कार्यकारी समितीच्या पाच उपसमित्या असत त्याच्याकडे न्याय, पाणी, जंगल, सुवर्ण आणि सामान्य व्यवस्था हि कामे सोपविली जात. चोलकाळात ग्रामसंस्थची खुपच वाढ झाल्याचे आलेखीय पुराव्यावरुन दिसते. उत्तरमेरुर येथील ग्रामसभेच्या कामाची माहिती देणारे २०० वर आलेख सापडले आहेत.

चोल काळात ग्रामसभेची सभा मंदिरे, तलावा शेजारी, सर्वजनिक ठिकाणी अथवा वृक्षाखाली भरवली जात असे. दुष्काळ व संकटाच्या प्रसंगी ग्रामसभा प्रजाजनाना विविध प्रकारे साहय करित असे. आणीबाणी च्या प्रसंगी राजा देखील ग्रामसभेचा सल्ला घेत असे. तथापी सम्राट व त्यांचे अधिकारी ग्रामसभेच्या कार्यावर नजर ठेवत. चोल काळात प्रत्येक गावाची घटना असे. त्यानुसार कामकाज चालत असे. प्रत्येक गावातील ग्रामसभची सभासदसंख्या भिन्न होती. ग्रामसभेत २०० ते १००० पर्यत गावाच्या लोकसंख्येनुसार सभासदांचा समावेश होई. गावाच्या सरंक्षणा बाबतही ग्रामणीच्या नेतुत्वाखाली ग्रामसभा पुढाकार घेई. या ग्रामसभा स्वायत्त होत्या त्यांच्या कार्यात राजाकडून (केंद्रिय शासनासंस्थे मार्फत) हस्तक्षेत होत नसे.

चोल कालीन ग्रामसभेची महत्वाची कामे म्हणजे आपत्ती व दुष्काळात कर कपाती बाबत राजाशी बोलणी करणे, गावाच्या कार्यक्षेत्रातील न्यायदानाचे कामे करणे, देवस्थानची व्यवस्था पहाणे, जमीन महसुल

जमा करण्याची व्यवस्था पहाणे, स्थानिक शिक्षणाची व्यवस्था पहाणे, पाण्याची व्यवस्था करणे, गावाच्या सामाईक जमीनी लागवडी खाली आणणे, विश्वस्त निधीची व्यवस्था इत्यादी कामे केली जात असे. थोडक्यात महसुल वसुली, ग्रामरक्षण, न्यायनिवाडा व जनकल्याण ही प्राचीन ग्रामसभेची कामे होती.

**समारोप :-**

प्राचीन कालखंडा तील ग्रामसभांच्या कार्याचा उल्लेख वेद साहित्यात आढळतो. या ग्रामसभा विशिष्ठ प्रसंगी गावातील पेचप्रसंग सोडविण्यासाठी गावातील जेष्ठांची सभा, बोलावून निर्णय घेत असे. हे कार्य ग्रामणीच्या पुढाकाराने होत असे. याच जेष्ठांच्या सभेचे कालांतराने ग्रामसभेत रूपांतर झालेले दिसून येते. प्रामुख्याने दक्षिण भारतातील ग्रामसभा जास्त सुसंघटीत व कार्यक्षम होत्या. चोल काळातील ग्रामसभांचे अस्तित्व व कार्या बाबत सविस्तर माहिती मिळते. संकट काळात ग्रामीण जनतेस तारणहार म्हणून ग्रामसभांची भूमिका प्राचीन काळातही महत्वाची आहे. संकट काळात राजाला विनंती करून शेतसारा कमी किंवा रदद करून घेण्याचे कार्य ग्रामसभा पार पाडत असे तसेच न्यायदानाचे महान कार्य देखील प्राचीन काळापासून ग्रामसभांनी यथा योग्य पार पाडलेले दिसून येते. लोककल्याणाची कामे देखील ग्रामसभेकडून पार पाडली जात असे.

**संदर्भ**

१. वा. भा. पाटील, पंचायत राज, प्रशांत प्रकाशन, जळगाव, २००९.
२. पी. जी. जोशी, प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास, विदया प्रकाशन, नागपुर, २००३.
३. के आर. बंग, भारतातील स्थानिक स्वशासन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, २००५.
४. अर्जूनराव दर्शनकार, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
५. व्ही. बी. पाटील, महाराष्ट्रातील पंचायतराज, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००९.
६. श्री निवास घैसास, ग्रामपंचायत कायदा आणि त्याचे महत्व, मनोरमा प्रकाशन, पथमावृत्ती, मुंबई, २०१३.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# ग्रामसभा : अधिकारी व कार्ये

**प्रा. श्रीमती कल्पना गोरक्षनाथ पगार,**
**राज्यशास्त्र विभाग,**
**नुतन विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगांव,**
**ता. निफाड, जि. नाशिक-**

भारत हे एक संघराज्य आहे आणि सत्तेची विभागणी हे संघराज्याचे खास वैशिष्टये आहे. स्थानिक स्वराज्य संस्था पासून तर संसदे पर्यंत अधिकार विभागणी झाली आहे.भारताने संसदीय लोकशाही पध्दतीचा स्विकार केला असल्यामूळे लोकशाही जनतेचा प्रमूख आधार आहे.

**प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार :-**

लोकशाहीचे प्रत्यक्ष लोकशाही आणि अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही असे दोन प्रकार सांगितले जातात. प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्यांत प्रत्यक्ष लोकशाहीचा वापर केला होता. प्रत्यक्ष लोकशाही याचा अर्थ राज्यातील सर्व नागरीकांनी राजकीय निर्णयप्रक्रीयेत सहभागी होणे होय. ग्रीक नगराज्यांच्या काळात राज्याची लोकसख्या व प्रादेशिक विस्तार या दोन्ही गोष्टी मर्यादित होत्या; त्यामुळे राज्यातील सर्व नागरिकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे शक्य होत असे. आधुनिक काळात राज्यांची लोकसंख्या व प्रादेशिक विस्तार यांत प्रचंड वाढ झाली असल्याने प्रत्यक्ष लोकशाहीचा अवलंब करणे शक्य नाही. म्हणूनच प्रत्यक्ष लोकशाहीची जागा अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीने घेतली. परंतु लोकशाही तत्वप्रणालीचे काही समर्थक असे प्रतिपादन करतात की, प्रत्यक्ष लोकशाहीत सामान्य नागरिकांच्या मतांना महत्व दिले जाते. आधुनिक काळातील प्रातिनिधिक लोकशाहीत नागरिकांच्या मतांची फारशी कदर केली जात नाही. मतदारांनी एकदा का आपला प्रतिनिधी निवडून दिला की मतदार त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे नियंत्रण ठेवू शकत नाही. लोकप्रतिनिधी देखील मतदारांच्या मतांची सहसा दखल घेत नाही. प्रत्यक्ष लोकशाहीचे गुण मान्य केले तरी आधूनिक काळात तिच्यावर पडणा-या मर्यादांकडेही दुर्लक्ष करता येत नाही. परंतू ग्रामपातळीवर कार्य करणारी ग्रामसभा म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार होय असे मानण्यास हरकत नाही. प्रत्यक्ष लोकशाहीप्रमाणे ग्रामसभेतही गावातील सर्व नागरिक आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करू शकतात आणि ग्रामपातळीवरील आपल्या प्रतिनिधींवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतात.

**सर्व प्रौढ नागरिकांची सभा**

स्थानिक स्वराज्य संस्थामधील सगळयात खालचा थर म्हणजे ग्रामपंचायत हा स्थानिक स्वराज्य संस्थाचा पाया आहे आणि या पायाचा प्रमूख आधार म्हणजे ग्रामसभा होय. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रौढ नागरिकांच्या ग्रामसभेत

अंतर्भाव होतो. ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १८६(१) अनुसार ग्रामपंचायत असलेल्या प्रत्येक गावासाठी ग्रामसभेची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे ग्रामसभेला एक वैधानिक संस्था म्हणून मान्यता लाभली इ.स. १९९३ च्या ७३ व्या घटना दुरूस्ती अन्वये राज्सघटनेत नव्याने समाविष्ट केलेल्या नवव्या भागातील कलम २४३(अ) मध्येही ग्रामसभेचा उल्लेख आहे. याचा अर्थ आता ग्रामसभेला घटनात्मक दर्जाही प्राप्त झाला आहे.

**ग्रामसभेच्या बैठका**

ग्रामसभेच्या वर्षातून किमान सहा बैठका घेतल्या जातात. या बैठका आयोजित करण्याची जबाबदारी सरपंच किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांच्यावर सोपविण्यात आली आहे. ग्रामसभेची बैठक बोलावणे सरपंचावर बंधनकारक असते.

साधारणतः महाराष्ट्रात खालील तारखाना ग्रामसभा आयोजित केल्या जातात

| | |
|---|---|
| १) २६ जानेवारी | प्रजासत्ताक दिन |
| २) १ मे | महाराष्ट्र दिन |
| ३) १५ ऑगस्ट | स्वातंत्र दिन |
| ४) २ आक्टोबर | गांधी जयंती |

सध्या ग्रामसभेच्या वर्षातून चार वेळेस बैठका घेतल्या जातात

**ग्रामसभेच्या बैठकीचे कामकाज**

ग्रामसभेच्या बैठकीत तिच्या कोणत्याही सदस्याला म्हणजे गावातील प्रौढ नागरिकाला ग्रामपंचायतीच्या कार्यक्रमाशी किंवा कामकाजाशी संबंधीत असलेले प्रश्न विचारला येतात ग्रामसभेत विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणे अध्यक्षावर बंधनकारक असते. ग्रामपंचायतीने विकासाची कोणती कामे किंवा योजना हाती घ्याव्यात यासंबंधी सूचना करण्याचा अधिकार ही ग्रामसभेच्या सदस्यांना असतो. अशा प्रकारे ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे आणि तिला मार्गदर्शन करण्याचे कार्य ग्रामसभा करते. ग्रामसभेच्या बैठकीत नागरिकांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याची वेळ आपणावर येणार आहे याची ग्रामपंचायतीच्या पदाधिका-यांना व पंचाना जाणीव असते त्यामुळे ते जबाबदारीच्या जाणिवेतून आपली कर्तव्ये पार पाडण्याचा प्रयत्न करतात.

प्रत्येक अर्थिक वर्षातील ग्रामसभेची पहिली बैठक त्या वर्षाच्या प्रारंभापासून दोन महिन्यांच्या आत आयोजित केली जाते.

**ग्रामपंचायतीला त्या बैठकीपुढे पुढील विषय माडाव्या लागतात**

१) वार्षिक लेखा विवरण

२) मागील आर्थिक वर्षाचा प्रशासन अहवाल

३) चालू आर्थिक वर्षात योजलेला विकास कार्यक्रम व अन्यकार्यक्रम

४) मागील लेखापरीक्षणाची टिपण्णी व तिला दिलेली उत्तरे

मागील पैकी कोणत्याही किंवा सर्व बाबींवर ग्रामसभेच्या वरील बैठकीत चर्चा केली जाते त्यानंतरच्या प्रत्येक बैठकीत चर्चा केली जाते त्यानंतरच्या प्रत्येक बैठकीत त्या वर्षात विकास कार्यक्रमांची झालेली प्रगती आणि साध्य केलेली उद्दीष्टये यांची माहीती दिली जाते.

**लोकशाही व्यवस्थेला मजबुती**

प्रत्यक्ष लोकशाहीचे महत्वपूर्ण साधन या दृष्टीकोनातून ग्रामसभेकडे पाहिले जाते साहजिकच ग्रामसभेला सक्षम बनविले तर लोकशही व्यवस्था आणखी बळकट होईल असा युक्तिवाद या संदर्भात केला जातो. पंचायत राज्याच्या योजनेतही लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग वाढविण्याच्या उद्दीष्टांचा उल्लेख आहे. ग्रामसभेच्या माध्यमातुन ग्रामीण जनतेला राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची संधी उपलब्ध होते म्हणून पंचायत राज्याची संकल्पना साकार करण्यात आणि ती यशस्वी करण्यात ग्रामसभा महत्वाची भूमिका बजावु शकते.

**ग्रामसभेचे अधिकार :-**

१) कलम ७ प्रमाणे - गावामध्ये काम करीत असलेल्या शासकीय निमाशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांच्या कार्यालयातील रोजच्या उपस्थितीवर ग्रामसभेचे शिस्त विषयक नियंत्रण असते अशा कर्मचाऱ्यांचे वार्षिक मूल्यमापन ग्रामसभेकडून त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दिले जाईल.

२) कलम ७ प्रमाणे :- ग्रामसभा ही अशा कोणत्याही कर्मचाऱ्याकडून घडलेली नियमबाह्य गोष्ट संबंधित गटविकास अधिकाऱ्याला अहवालामध्ये नमूद करुन देईल. त्यावर ३ महिन्याच्याआत गटविकास अधिका-याने कार्यवाही केली पाहिजे.

३) कलम ८ नुसार :- ग्रामसभा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या व्यक्तिगत लाभधारक योजनेकरीता लाभधारकाची निवड करते.

४) कलम ९ नुसार ग्रामसभा सर्वसाधारणपणे पुढच्या सभेचा दिनांक वेळ, ठिकाण तिच्या अगोदरच्या सभेत निश्चित करते.

५) कलम १० नुसार :- ग्रामसेभेस गावात काम करणारे शासकीय, निमशासकीय आणि पंचायतीचे सर्व कर्मचारी

ग्रामसभांना हजर राहतील.

६) कलम ८ अ नुसार :- पंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूवी मान्यता देणे.

७) कलम ८ अ (२) प्रमाणे :- विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतीला परवानगी देणे.

८) कलम ४५ पोटकलम ६ ड नुसार पंचायत विकास योजनावर कोणताही खर्च करण्यासाठी ग्रामसभेची परवानगी घ्यावी लागते.

९) ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ८ मध्ये सुधारणा करुन (८ अ) ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य म्हणून घालण्यात आलेले आहे. ग्रामसभा गावची सर्वोच्च सभा म्हणून सबळ व्हावी या हेतुने ग्रामपंचातीने ग्रामसभेची मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. गावाचे अधिकार आजपर्यंत ग्रामपंचायतीमार्फत राबविले जात होते ते आता ग्रामसभेच्या अधिकार क्षेत्रात आहेत.

१०) कलम ८ अ (३) प्रमाणे - कोणतीही भूमी संपादन करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने आपले मत कळविण्याआधी ग्रामसभेचे मत घेणे आवश्यक असते. उदा. संपादनाचा हेतु विस्तापित होण्याची शक्यता विस्तापितांचे पुनर्वसन इ. माहिती प्राधिकरणाकडून मिळविण्याचा ग्रामसभेला अधिकार यात अभिप्रेत असतो.

११) ग्रामदक्षता समिती, ग्रामशिक्षण समिती, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व लेखा परीक्षण समिती सारख्या महत्वाच्या समित्या ग्रामसभेने निवडायच्या असतात.

१२) संपूर्ण ग्रामीण रोजगार राष्ट्रीय रोजगार हमी योजनेखालील कामे तसेच ग्रामीण भागाशी संबंधित महत्वाचे कार्यक्रम घेतांना व त्यांची अंमलबजावणी करतेवेळी ग्रामसभेपुढे अशा कार्यक्रमांची माहिती दिली पाहिजे.

१३) ग्रामसभा ही गावातील स्त्री -पुरुषांना विकासकामे व नियोजनाच्या कामात सहभागाच्या अधिकारासोबत ग्रामपंचायतीच्या कारभारावर व गावकारभारावर नियंत्राणाचा अधिकारही देते.

**मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अधिकनियम २००६ नुसार ग्रामसभाबाबत विशेष सुधारणा :-**

१) विकास कामाच्या आर्थिक अहवाल प्रत्येक सहा महिन्यात ग्रामसभेपुढे ठेवणे.

२) एकुण मतदारांपैकी २०% मतदारांनी आर्थिक हिशोब ग्रामसभेसमोर न ठेवल्यासंबंधी तक्रार केल्यास पंचायतीच्या सदस्याला/सरपंचाला किंवा उपसरपंचाला काढुन टाकण्याचा अधिकार

३) अधिक गैर व्यवहारास ग्रामसेवक (सचिव) आणि सरपंच संयुक्तपणे जबाबदार राहतील कलम ५७ नुसार आणखी अधिकार देण्याची मागणी

ग्रामसभेचे वरील स्वरुप लक्षात घेऊन जिला आणखी अधिकार देण्याची मागणी काही विचारवंत करु लागले

आहेत. सद्य स्थितीत ग्रामसभेला प्रामुख्याने चर्चा व विचारविनिमय यासंबंधीचे अधिकार आहेत. परंतु तिचेही अधिकार पुरेसे नाहीत. अंमलबजावणीच्या कार्यातही तिचा सहभाग वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत असे काही जणांचे म्हणणे आहे.

ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व पंच हे आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावत नसतील तर त्यांना परत बोलविण्याचा अधिकारही ग्रामसभेला असला पाहिजे अशी मागणीही काही विचारवंतानी केली आहे. ग्रामसभा सक्षम बनली तर ग्रामपंचायतीचे पदाधिकार आपल्या कर्तव्यात कसून करणार नाहीत किंवा त्यांच्याकडून अधिकारांचा दुरुपयोग होणार नाही.

**ग्रामसभेची वास्तविका स्थिती :-**

लोकशाही प्रक्रियेत ग्रामसभा महत्वाची भूमिका बजावू शकते हे खरे असले तरी प्रत्यक्षात मात्र गावच्या कारभ्ांरात ग्रामसभेचा प्रभाव फारसा जाणवत नाही. असाच सार्वत्रिक अनुभव आहे. याला काही अपवाद असतीलही परंतु बहुसंख्य गावांच्या बातीत असेच आढळुन येते की ग्रामसभेच्या अस्तित्वाची विशेष दखल घेतली जात नाही याला अनेक घटक कारणीभूत आहेत. ग्रामीण जनतेची राजकीय उदासिनता तिचे अज्ञान व निरक्षरता आपल्या राजकीय हक्क्ांविषयी असलेली तिची अनभिज्ञता ग्रामीण समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता त्या समाजात अद्यापही असलेला जातीयतेचा प्रभाव, ग्रामीण राजकारणाला प्राप्त झालेले जातीयवादी वळण प्रबळ जाती व वर्गांची ग्रामीण राजकारणावर असलेली जबरदस्त पकड हे त्यापैकी काही प्रमुख घटक होत.

**ग्रामीण विकासात व राजकारणात ग्रामसभेचा प्रभाव वाढण्यासाठीचे उपाय**

१) जास्तीत जास्त जन जागृती करावी.

२) महिला ग्रामसभांचे आयोजन करुन त्यांना प्राधान्य द्यावे. २६ जाने २००३ पासून महिला ग्रामसभांचे आयोजन केले जाते.

३) ग्रामसभा डिजीटल करण्याचा प्रयत्न करावा. उदा. ग्रामसभेची वेळ दिनांक ही प्रत्येक प्रौढ नागरिकांच्या मोबाईलवर एस.एम.एस. द्वारे तसेच ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या सर्व प्रौढांची नागरिकांची नोंद संगणकाद्वारे केली जावी.

४) ग्रामीण भागातील जनता शेती व्यवसाय करीत असल्यामुळे शेतात जर लागवड, कापणी यांसारखे महत्वाचे काम चालु असल्यास ग्रामसभेचे तेव्हा आयाजन करु नये.

५) तसेच ग्रामसभेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्यास ग्रामसभा उत्साहपूर्वक पार पडू शकते.

६) ग्रामसभेस उपस्थित असणा-या सर्व नागरिकांसाठी अल्पोपहाराची सोय करावी.

अशा प्राकरे विकास साधण्यासाठी ग्रामसभेचा विकास महत्वाचा आहे कारण ग्रामीण विकास हा देशाचा पाया आहे. ग्रामीण विकास झाला तर देशाचा विकास होईल व महात्मा गांधीनी जगाला दिलेला संदेश खेड्याकडे वळा खेडयाकडे परत चला हा संदेश पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामसभा ही महत्वाचा कणा आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

सर्व प्रौढ नागरिकांनी ग्रामसभेस उपस्थित राहुन ग्रामीण विकासास हातभार लावावा.

**संदर्भ :-**

१) भारतीय प्रशासन प्रा. व्ही.बी. पाटील (केसागर)

२) पंचायती राज्य- डॉ. वा.भा. पाटील

३) स्थानिक स्वराज्य संस्था

४) रा. गो. देवगावंकर, पंचायत राज आणि सामुहिक विकास, श्री साईनाथ प्रकाशन, प्रथमावृत्ती, नागपूर, २००७

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# ग्रामीण विकासात आणि राजकारणात ग्रामसभेची भूमिका

**प्रा. शिंदे प्रविण कारभारी ,**
**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**ओझर (मिग), ता.निफाड जि.नाशिक.**
**सलंग्न सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ.**

**प्रस्तावना :-**

खरा भारत हा खेडयांमध्ये राहतो ! हे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे वाक्य आजही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टकोनातून सत्यच आहे. आणि भविष्यामध्ये देखील सत्यच असेल कारण आजही भारताची ६८.८ % लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) ग्रामीण भागात निवास करते. कृषी क्षेत्राचा वाटा एकूण घरगुती उत्पादनामध्ये जरी कमी होत असला तरी अजूनही राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने कृषीचे महत्व अबादितच आहे. यामुळे ग्रामीण विकास हे केंद्र व राज्य सरकारच्या विकास धोरणाचे प्रमुख लक्ष राहिलेले आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना :-**

ग्रामीण विकासाची संकल्पना ही बृहत स्वरुपाची व सर्वसमावेशक आहे. ज्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी साधनसंपत्ती या दोन्हींच्या विकास कार्याचा समावेश होतो. त्याचबरोबर दोन्हीही म्हणजे लोकांचा आर्थिक विकास व सामाजिक पुर्नरचना यांचाही समावेश होतो.

**ग्रामीण विकासाचा उद्देश :-**

१) ग्रामीण भागातील सर्व लोकांना आरोग्य, ज्ञान, कौशल्य, विकसन, उत्पादन व उत्पन्न आणि निर्णय प्रक्रियेमधील सहभागाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे.

२) सामाजिक व आर्थिक विषमता आणि असमानता कमी करणे.

३) अस्तित्वातील नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षमपणे वापर करणे, त्यांचे संर्वधन व जतन करणे इत्यादी आहेत.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकास हे ध्येय प्रामुख्याने दारिद्रय निर्मुलन कार्याशी एकरुप बनले आहे. म्हणजेच ग्रामीण विकासाचे मुख्य उद्दिष्ट दारिद्रयाचे निर्मुलन करणे आहे.

**ग्रामीण विकास आणि पंचायत राज :-**

ग्रामीण विकास हे ध्येय साध्य करायचे असेल तर स्थानिक पातळीवर ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा

परिषद या संस्थांना अधिकाधिक बळकट करुन त्यांना आर्थिक स्वायत्ता देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सत्तेचे विकेंद्रीकरण ही संकल्पना खऱ्या अर्थाने यशस्वी करायची असेल तर या स्थानिक संस्थाना अधिकाधिक अधिकार देणे गरजेचे आहे. याच भूमिकेतून ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे भारतीय संविधानात ९ व्या भागात कलम २४३ समाविष्ट करण्यात आले. तसेच पंचायती राज संस्थांकडे २९ बाबी हस्तांतरीत करण्यात आला त्याचा अंतर्भाव असलेले ११ वे परिशिष्ट संविधानात समाविष्ट करण्यात आले.

**७३ व्या घटनादुरुस्तीतील महत्वपूर्ण तरतूदी :-**

१) **ग्रामसभा :-** कलम २४३ (अ) नुसार ग्रामसभा स्थापन करणे आणि त्यांचे अधिकार यासंबंधी तरतूदी दिलेल्या आहेत.

२) **पंचायती राजसंस्था :-** कलम २४३ (ब) नुसार ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद स्थापन करण्याची तरतूद आहे.

३) **आरक्षित जागांसंबंधीची तरतूद :-** कलम २४३ (ड) मध्ये निर्वाचित जागांमध्ये अनुसूचित जाती व जमाती आणि महिलांसाठी आरक्षित जागांसंबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या.

४) **पंचायती संस्थांचे अधिकार :-** कलम २४३ (जी) मध्ये पंचायती संस्थांने अधिकार व कार्य व जबाबदारी संबंधी तरतूदी आहेत.

**ग्रामीण विकास आणि ग्रामसभेची भूमिका** :-

पंचायत राज व्यवस्थेतील सर्वात कनिष्ठ व महत्वाचा स्तर म्हणजे ग्रामपातळी आहे. ग्रामपंचायत हा महाराष्ट्रातील पंचायतीराजचा पायाभूत घटक आहे. सध्यास्थितीत महाराष्ट्रात २७,९०६/- ग्रामपंचायती आहेत. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारणी समिती असते. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या कमीत कमी ७ आणि जास्तीत जास्त १७ असून जिल्हाधिकारी लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या निर्धारित करतो. ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड प्रौढ मताधिकार व गुप्त मतदान पध्दतीने होते. यासाठी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातुन जितके सभासद निवडायचे असतील तितके प्रभाग करण्यात येतात.

**ग्रामपंचायतीची रचना पुढील प्रमाणे** :- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ७ ते १७ सदस्य असू शकतात.

**सरपंच** :- प्रत्येक ग्रामपंचातीला एक प्रमुख असतो त्याल सरपंच असतो. त्याची निवड ग्रामपंचायतीच्या सभासदांद्वारे होते. ग्रामपंचायतीच्या सभांचे कामकाज सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होते. गावाच्या कारभारावर त्याचे प्रत्यक्ष नियत्रंण असते. गावातील विकासाची कामे त्याच्या देखरेखी खाली केली जातात.

**ग्रामसेवक** :- ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी ग्रामसेवक या शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली असते.

**ग्रामसभा** :- ग्रामसभेमध्ये गावातील १८ वर्षे पुर्ण करणारे सर्व स्त्रि - पुरुष सहभागी होतात. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक आणि गावाच्या विकासाचे कार्यक्रम ग्रामसभेमध्ये सादर केले जातात. त्याबाबत नागरिक प्रश्न विचारु शकतात. सरपंच हे ग्रामसभेच्या बैठकीचे अध्यक्ष तर ग्रामसेवक हा सचिव असतो. ग्रामसभेने मंजुर केलेले विकास कार्यक्रमच ग्रामपंचायत राबविते.

**ग्रामसभेची कामे** :-

१) ग्रामपंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक मंजुर करणे.

२) मागिल वर्षाचे हिशोब व ऑडीट अहवाल मंजुर करणे.

३) मागिल वर्षाचा प्रशासनाबाबतचा अहवाल मंजुर करणे.

४) चालु वर्षातील विकासाबाबत व इतर कार्यक्रमांना मंजुरी देणे.

५) खेडयातील उत्पादन व्यवस्थेची योजना मंजुर करणे.

६) ग्रामपंचायतीचे सभासद निवडणे.

**ग्रामसभा बळकटीकरण अभियान** :- ७३ व्या घटनादुरुस्ती नुसार ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यात आले त्यामुळे ग्रामपंचायतीमधील प्रत्येक नागरिक ग्रामसभेमध्ये, निर्णय प्रक्रियेमध्ये सामील होऊन ग्रामपातळी वरील कारभारामध्ये पारदर्शकता येणे ग्रामसभा व जनजागृतीमध्ये अभिप्रेत आहे. यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ नुसार ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेणे बंधनकारक केले.

शासनाने प्रत्येक ग्रामीण नागरिक हा ग्रामसभेला उपस्थित राहून त्याला ग्रामसभेची अधिकार आणि कर्तव्य अवगत होवून तो ग्राम प्रशासनात व ग्रामविकासाच्या कार्यात सहभागी व्हावा यासाठी शासनाने किमान ६ ग्रामसभा घेणे प्रत्येक ग्रामपंचायतीला बंधनकारक केले. ग्रामपंचायत अधिनियमामध्ये दिनांक १९ जुलै २०१२ रोजी राज्य विधानसभा परिषदेने संमत केलेल्या विधेयकानुसार विधेयकांची संख्या आर्थिक वर्षात ६ वरुन पुन्हा ४ वर करण्यात आली. आणि या विधेयकाची अंमलबजावणी दिनांक २ ऑक्टोबर २०१२ पासून सुरु झाली. आज २ ऑक्टोबर, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि १ मे या दिवशी ग्रामसभा घेतल्या जातात. या व्यतिरीक्त ग्रामपंचायत आवश्यकतेनुसार किंवा केंद्र/राज्य शासनाच्या निर्देशानुसार अधिक ग्रामसभा घेऊ शकते. केंद्रशासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने सन २००९ -२०१० हे वर्ष ग्रामसभा म्हणून जाहिर केले. या कालावधीत ग्रामसभा जनजागृतीसाठी विविध उपक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या. राष्ट्रीय गौरव ग्रामसभा स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पुरस्कार (रुपये दहा लाख) प्राप्त झाला. ग्रामपंचायत चेहडी तालुका चोपडा जिल्हा जळगांव या

ग्रामपंचायतीने राष्ट्रीय ग्रामसभेचा प्रथम पुरस्कार मिळवला.

**निष्कर्ष :-**

ग्रामसभेमध्ये गावातील १८ वर्ष पुर्ण झालेले स्त्रि - पुरुष हे सहभागी झालेले असतात. ग्रामसभेचे महत्व ओळखून ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनातील सर्वोच्च यंत्रणा आहे. म्हणून ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यात आले. ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या कार्यावर नियंत्रण ठेवत असते. तसेच ग्रामपंचायतीने कोणती कामे करावी हे ग्रामसभाच ठरवत असते. तसेच ग्रामसभेमध्ये गावातील सर्वच १८ वर्ष पुर्ण झालेल्या लोकांचा समावेश होत असल्याने लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त होते. सार्वजनिक प्रश्नांची जाण होते. गावाच्या समस्या, अडीअडचणी समजतात त्यातूनच लोकांचे सामाजिकरण मोठ्या प्रमाणात घडून येते. राजकीय सहभागाचे प्रमाण वाढते. नेतृत्व निर्मिती होते. त्यामुळे लोकशाही व्यवस्था मजबुत होते. सत्तेचे विकेंद्रीकरणही घडून येते आणि ग्रामीणविकासही चांगल्या पध्दतीने होतो. ग्रामीण विकासात ग्रामसभा महत्वपुर्ण भूमिका बजावत असते.

**संदर्भ साहित्य :-**

१) लेखक - अमोल घोडके पुस्तकाचे नांव - भारतातील मानव संसाधन विकास (द युनिक ॲकॅडमी)
२) लेखक - तुकाराम जाधव, महेश शिरापुरकर पुस्तकाचे नांव - भारतीय संविधान व राजकारण (द युनिक ॲकॅडमी)
३) इंटरनेट माहिती. ( सर्च इंजिन - गुगल, विकीपिडीया)

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# ग्रामसभेचे महत्व

**प्रा. शिवाजी गायकवाड,**
**सहयोगी प्राध्यापक,**
**(राज्यशास्त्र विभाग प्रमुख),**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला**
**ता. येवला, जि. नाशिक. ४२३४०१**

इतिहासात स्थानिक स्वराज्य संस्थेचा उल्लेख पुरातन काळापासुन सापडतो. प्राचिन काळात सर्व सुख संपन्न गावे अस्तित्वात होती असाही उल्लेख इतिहासात वाचावयास मिळतो. यवन, मोगल व इंग्रज यांच्या काळात त्यांचे स्वातंत्र्य कमी कमी होत गेले व शेवटी इंग्रजांनी त्यांचे अस्तित्व नष्ट केले. कालांतराने भारताला स्वातंत्र्य मिळाले, राष्ट्रीय विकासाची जबाबदारी भारतीयांवर येवुन पडली. भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे ९०% जनता खेड्यात राहते. म्हणुन भारताचा विकास म्हणजे खेड्यांचा विकास असे समिकरण बनले. त्यांच्या विकासाची योजना सन १९५२ मध्ये सामुहिक विकास योजना या नावाने देशात सुरु झाली. त्याच योजनेचे रुपांतर नंतर पंचायत राज यंत्रणेत करण्यात आले. आज जागतिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. राज्याने लोककल्याणकारी राज्याची कल्पना स्विकारल्यामुळे नागरीकांना जास्तीत जास्त सोयी सुविधा पुरविणे हे राज्याचे कर्तव्य बनले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्वा प्राप्त झाले. त्या अनुशंगाने भारतीय राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वांच्या कलम ४० मध्ये राज्यात ग्रामपंचायतींची स्थापना करावी असे नमुद करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीचे लहान स्वरुप आहे.

ग्रामपंचायत पंचायत राज ची आधारशिला मानली जाते. ज्या क्षेत्राकरीता ग्रामसभा रचनेच्या स्वरुपात कार्य करते त्याच क्षेत्राकरीता ग्रामपंचायत एक कार्यपालीका म्हणुन कार्य करते. ग्रामपंचायत लोकांच्या अगदीच जवळची संस्था आहे. पंचायत राजच्या दृष्टीने लोकांची प्रतिक्रिया गावच्या संदर्भात पंचायतीच्या कार्यकुशलतेवर अवलंबुन असते.

महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेत सर्वात कनिष्ठ संस्था ग्रामपंचायत आहे. इ.स. १८३२ मध्ये सर चालर्स मेटकाल्फ यांनी असे म्हटले होते की, ग्रामिण समुदाय ही छोटी प्रजासत्तेतच होती. त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी अस्तित्वात होत्या. स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यापूर्वी मुंबई प्रांत होता. मुंबई प्रांतात १९२० च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामपंचायतीची स्थापना झाली.

मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ अन्वये सपाट भुप्रदेशासाठी ६०० तर डोंगराळ अनुसूचित क्षेत्रासाठी ३०० लोकसंख्या असलेल्या गावात ग्रामपंचायतीची स्थापना केली जाते. अधिनियमातील कलम १० नुसार ग्रामपंचायत सदस्यांची

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

संख्या कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १७ इतकी असते. सदस्यांची संख्या लोकसंख्येवर अवलंबुन असते.

| अ.नं. | लांकसंख्या | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | १५०० किंवा त्यापेक्षा कमी | ०७ |
| २ | १५०० ते ३००० लोकसंख्या | ०९ |
| ३ | ३००१ ते ४५०० लोकसंख्या | ११ |
| ४ | ४५०१ ते ६००० लोकसंख्या | १३ |
| ५ | ६००१ ते ७५०० लोकसंख्या | १५ |
| ६ | ७५०१ ते त्यापेक्षा जास्त | १७ |

अशा लोकसंख्येच्या प्रमाणात सदस्यांची निवड केली जाते. त्यांची निवड ५ वर्षासाठी केली जाते. ग्रामपंचायत सदस्यांना पंच असे म्हणतात. ग्रामपंचायत ग्रामसभेच्या आधारे आपली कार्यक्रम राबवित असते.

**ग्रामसभा :**

ग्रामपंचायतीच्या स्तरावर ग्रामसभा घेतली जाते. ग्रामसभा ही लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्था आहे व ती सार्वभौम व स्वयंभु आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६ मध्ये ग्रामसभेची तरतुद करण्यात आली आहे. गावातील सर्व प्रौढ नागरीकांची मिळुन ग्रामसभा तयार केली जाते. गावातील १८ वर्ष वय पुर्ण करणाऱ्या प्रत्येक मतदारास ग्रामसभेचे आपोआप सभासदत्व प्राप्त होते. ग्रामसभेसाठी कोणतीही निवडणुक लढवावी लागत नाही. ग्रामपंचायतीचे सर्व मतदार ग्रामसभेचे सभासद असतात.

**ग्रामसभेचे उद्दीष्ट्ये :**

१. आपण निवडुण दिलेले प्रतिनिधी कारभार व्यवस्थीत चालवत आहेत की, नाही हे पाहणे आणि त्यांना जाब विचारणे.
२. ग्रामस्थ ग्रामसभेत आपल्या अडचणी मांडु शकतात.
३. गावाच्या कारभारासाठी बहुमताने निर्णय घेणे.
४. गावाच्या विकासाची जबाबदारी ग्रामस्थांवर सोपविणे.

वरील प्रमाणे ग्रामसभा आपले उद्दीष्ट्य पार पाडते व त्याप्रमाणे आपला व्यवहार करतात. या उद्दीष्टांबरोबर ग्रामसभेचे काही नियम असतात.

१. वर्षातुन किमान सहा वेळा ग्रामसभेच्या सभा झाल्या पाहिजेत.
२. ग्रामसभेत कोणीही प्रश्न विचारु शकतो.
३. वर्षातुन किमान चार वेळा सभा न घेतल्यास सरपंच, उपसरपंच यांना पदावरुन काढुन टाकता येते.
४. प्रत्येक वित्तीय वर्षात किमान सहा सभा घ्यावयाच्या असतात. आवश्यकता असल्यास असाधारण बैठकीही

बोलविता येते.

ग्रामसभेची नोटीस काढण्याचे आदेश सरपंचाकडुन दिले जातात. तर अंमलबजावणी ग्रामसेवक करतो. सर्वसाधारण सभेच्या १० दिवस आधी नोटीस बजावणे आवश्यक असते. ग्रामसभेच्या नोटीसीमध्ये स्थळ, वेळ व तारिख यांचा स्पष्ट उल्लेख असावा लागतो. याशिवाय चर्चेत घेण्यात येणाऱ्या विषयांची यादी सादर केली जाते. एखाद्या नागरीकाला ग्रामसभेत प्रस्तावा मांडायचा असेल तर तो सभेच्या दोन दिवस आगोदर लेखी स्वरुपात सभेच्या अध्यक्षाकडे देणे आवश्यक असते. अध्यक्षाला आलेला प्रस्ताव बदनामी कारक असेल किंवा संदिग्ध असेल तर तो नाकारण्याचा अधिकार असतो. स्विकारलेल्या प्रस्तावांवर चर्चा घडुन ते मान्य किंवा अमान्य केले जातात.

ग्रामसभेत हजर राहण्याचा, आपले मत व विचार मांडण्याचा प्रत्येक नागरीकास अधिकार आहे. जसे नागरकांना हे अधिकार आहे तसेच त्यांनी आपले कर्तव्य बजावणे हेही नागरीकांचे काम आहे.

ग्रामसभेत जे ठरेल, जे ठराव होतील त्यांची अंमलबजावणी करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. नागरीक जर ग्रामसभेला गेले नाही तर सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक हे मनमानी कारभार करतील.

वर्षातुन ६ ग्रामसभा घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. त्यापेक्षा जास्तही सभा घेतल्या तरी चालतात. ४ ग्रामसभेच्या तारखा देखील निश्चित केल्या आहे.

१) २६ जानेवारी : प्रजासत्ताक दिन.
२) ०१ मे : कामगार दिन.
३) १५ ऑगसट : स्वातंत्र्य दिन.
४) ०२ ऑक्टोंबर : महात्मा गांधी जयंती.

वरील तारखांना ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. याशिवाय दोन सभा ग्रामपंचायत आपल्या सोयीनुसार घेवु शकते.

निवडणुक झाल्या नंतरच्या पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच हाच असतो. त्याच प्रमाणे आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्षही सरपंचच असतो. इतर ग्रामसभांचे अध्यक्षपद सभेच्या बैठकीस उपस्थित असलेल्या व्यक्ती मधुन त्या त्या बैठकीच्या वेळी एखादी व्यक्ती भुषविते.

ग्रामसभेची गणपुर्ती ही एक मतदारांच्या १५ टक्के किंवा १०० यापैकी जी संख्या कमी असेल एवढे मतदार उपस्थित राहीले की गणपुर्ती झाली असे समजले जाते. ठरलेल्या वेळेनंतर अर्धा तास वाट पाहुन ही गणपुर्ती पुर्ण झाली तर सभा तहकुब केली जाते. त्याच वेळेस सभेची पुढील तारिख ठरविली जाते. यावेळेस मात्र गणपुर्तीची आवश्यकता नसते.

ग्रामसेवक हा ग्रामसभेचा सचिव म्हणुन काम पाहतो. ग्रामसभेचे इतिवृत्त तयार करुन तो सांभाळुन ठेवतो. त्याच्या गैरहजेरीत अध्यक्ष सांगेल तो शिक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका यासारख्या शासकीय, निमशासकीय किंवा ग्रामपंचायत कर्मचारी यापैकी कोणीही एक इतिवृत्त तयार करतो.

ग्रामपंचायतीचे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासुन सुरु होवुन ३० मार्चला संपते. या आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या चार साधारण व दोन विशेष साधारण सभा होतात. २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या दोन सभा विशेष सभा म्हणुन ओळखल्या जातात.

ग्रामसभेच्या पहिल्या बैठकीसमोर पुढील विषय चर्चेला ठेवतात.

१) मागील वर्षात ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामांचा प्रशासकीय अहवालाचे वाचन.
२) मागील वर्षात ग्रामपंचायतीने केलेल्या जमा खर्चाचे घटकवार वाचन.
३) मागील वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाचे वाचन.
४) ग्रामपंचायतीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन व त्यानुसार चालु वर्षी हाती घेतल्या जाणाऱ्या विकास कार्याची माहिती.
५) पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेने सुचविलेले विषय.
६) राज्य सरकारने सुचविलेले विषय.

इत्यादी महत्वाचे विषय बैठकीत चर्चेला घेतले जातात. ग्रामपंचायतीला आवश्यक असणारे इतर विषय ग्रामसभेच्या दुसऱ्या सभेत चर्चेला घेतले जातात. उदा. ...

१) सहा महिन्यात ग्रामंपचायतीकडुन झालेला खर्च.
२) चालु वर्षातील राहिलेल्या कालावधीत ग्रामपंचायती कडुन केली जाणारी विकास कामे.
३) ग्रामपंचायतीचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक.
४) याविषया व्यतिरिक्त आवश्यक असणारे इतर विषय.

अशा वेगवेगळ्या विषयावर ग्रामसभेत सखोल चर्चा होते. हे होत असतांना ग्रामसभेत ठराव मांडणे, त्यावर बहुमत घ्यावे, ठरावाचे इतिवृत्त संमत-असंमत जे असेल ते प्रोसिडींग बुक मध्ये लिहीले आहे किंवा नाही ते मोठ्याने वाचुन दाखवावे. चुकीची माहिती लिहीणे हे प्रकार अलीकडच्या काळात सर्रास चालतांना दिसतात.

प्रत्येक ग्रामसभेपुर्वी एक दिवस आगोदर महिलांची सभा घेणे आवश्यक आहे. त्या सभेत पारीत झालेले ठराव जसेच्या तसे ग्रामसभेत घ्यावे लागतात.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ नुसार ग्रामसभेची बैठक बोलावणे सरपंचावर बंधनकारक असते. सरपंच किंवा उपसरपंचाने बैठक घेण्यास उदासिनता दाखविली तर त्यांना पदावरुन काढुन टाकले जावु शकते. तसेच ग्रामसभेची बैठक बोलवियात ग्रामपंचायतीच्या सचिवाने कसुर केल्याचे आढळुन आल्यास त्याच निलंबीत करण्यास किंवा त्याच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यास तो पात्र ठरतो.

अशा पद्धतीने ग्रामिण पातळीवर ग्रामसभेला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. नागरीकांनी आपले कर्तव्य पार

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

पाडल्यास ग्रामिण विकास होण्यास मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल व होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसेल. परंतु महाराष्ट्रात सध्या ग्रामसभेला असलेले दुय्यम स्थान प्राप्त होण्याची कारणे :

१) ग्रामिण राजकारणाचे विशिष्ट स्वरुप.
२) सामान्य जनतेची राजकीय उदासिनता.
३) खेड्यांची सामाजीक रचना.
४) गैरसोयीची ग्रामसभेची वेळ.
५) पदाधिकाऱ्यांकडुन उपेक्षा.
६) अज्ञान व निरक्षरता.
७) स्त्रियांची उदासिनता.
८) उपयुक्त चर्चेचा अभाव.

अशा कारणांमुळे ग्रामसभा दुर्लक्षित झाली आहे. ग्रामसभा प्रभावी करायची असेल तर बोंगीरवार समितीने केलेल्या सुचनांचे पालन केल्यास ग्रामसभा प्रभावी होवु शकेल.

१) ग्रामसभेची बैठक बोलाविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी प्रमुखावर टाकावी.
२) बैठक बोलविणारा टाळाटाळ करणाऱ्या सरपंचास पदावरुन दुर करावे.
३) ग्रामसभेची बैठक दसरा, कोजागीरी पौर्णिमा या उत्सवांच्या दिवशी बोलवावी व मनोरंजनाचे कार्यक्रम ठेवावे.
४) विकास अधिकाऱ्यांनी आपल्या फिरतीचा कार्यक्रम ग्रामसभेच्या बैठकीशी सुंसंगत ठेवावा.
५) शेतीच्या कामांचा हंगाम असल्यास ग्रामसभा ठेवु नये.

या सुचनांचे पालन केल्यास ग्रामसभा प्रभावी होईल व खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात येईल. ग्रामसभेची सुचना प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचविली पाहिजे की जेणे करुन ग्रामसभेला जास्तीत जास्त लोक जमा होतील. कारण लोकशाहीचा खरा आधार जास्त जनता हाच आहे.

**संदर्भ :**

१) पंचायत राज : डॉ. वा.भा. पाटील
२) महाराष्ट्राचे शासन व राजकारण : डॉ. शोभा कारेकर
३) महाराष्ट्राचे शासन व राजकारण : डॉ. शरद घोडके.
४) महाराष्ट्रातील पंचायत राज : के. सागर
५) भारतीय शासन व राजकारण : डॉ. अलका देशमुख
६) इंटरनेट

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

# POWER AND FUNCTION OF GARMSABHA

**Raju sudam sanap,**
**Assistant Professor .**
**Dept. Of Politics,**
**B.V.Arts Commerce & science College,**
**Borivali (west) Mumbai.**

**Introduction**:-

Gram Sabha (GS) is the cornerstone of the entire scheme of democratic decentralization in India initiated through the 73rd Amendment to the Constitution. Hence, the success or failure of the Panchayati Raj system largely depends on how powerful and effective the GS is at the decentralized level to fulfill the desires and inspirations of the people. Recognizing the critical role of theGS in village economy Gandhiji had said that true democracy could not be worked by some persons sitting at the top. It had to be worked from below by the people of every village. Later on, endorsing the view of Gandhiji, Jay PrakashNarain had said: "To me Gram Sabha signified village democracy. Let us not have only representative government from the village upto Delhi. In one place, at least let there be direct government, direct democracy. The relationship between Panchayat and Gram Sabha should be that of Cabinet and Assembly". It is due to the importance of this institution at local level that the Year 1999-2000 has been declared as 'Year of Gram Sabha' by the Government of India.

Article 243(B) of the Constitution defines the GS as a body consisting of persons registered in the electoral rolls relating to a village comprised within the area of the Panchayat at the village level. With regard to its powers and authority, Article 243 (A) of the Constitution says that the GS may exercise such powers and perform such functions of the village level as the Legislature of a State may, by law, provide. It is in the light of this that State legislatures have endowed certain powers to this corporate body relating to the development of the village.The Gram Sabha is a meeting of all adults who live in the area covered by a Panchayat.Anyone who is 18 years old or more and who has the right to vote is a member of the Gram Sabha.Every village Panchayat is divided into wards ,smaller areas.Each ward elects a representative who is known as the ward member.All the members of the Gram Sabha also elect a sarpanch who is the Panchayatpresident.The Ward Panchs and the Sarpanch form the Gram Panchayat.The Gram Panchayat is elected for five years The Gram Panchayat has a secretary who is the secretary of the Gram Sabha.This person is not an elected person but is appointed by the government.The Secretary

is responsible for calling the meeting of the Gram Sabha and Gram Panchayat and keeping a record of the proceedings. The Gram Sabha is the key factor in making the Gram Panchayat play its role and be responsible .It is the place where all plans for the work of the Gram Panchayat are placed before the people.The Gram Sabhaprevents the Panchayat from doing wrong things like misusing money or favouring certain people.It plays an important role in keeping an eye on the elected representatives and in making them responsible to the persons who elected them A study of the State Panchayat Acts reveals that the GS is to perform numerous functions like discussing the report on socio-economic development programmes implemented by the Gram Panchayat (GP) in the previous financial year, examine the annual statement of the accounts and audit report as well as annual report of administration of the GP in the last financial year; (c) examine the budget of the GP for the next financial year, identification of the beneficiaries of various anti-poverty and rural development programmes; scrutinize on-going and completed schemes and works of the GP, undertake programmes of adult education and family welfare in the village mobilisation of voluntary labour and contributions in kind or cash or both for community welfare programmes and promotion and unity and harmony among all sections of society in the village.This list of functions indicates that the GS has the power only to discuss, debate, examine and scrutinize. There is no binding on the part of the Gram Panchayat to implement its directions and decisions of the GS. If the institution of the GS has to be made functional as it ought to be, it must be endowed with the power to implement schemes. However, provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act 1996, Extension Act for short, has not only extended development, planning and audit functions to the GS but also endowed it with the management and control of natural resources and the adjudication of justice in accordance with traditions and customs. But this is applicable in areas dominated by the Scheduled Tribes in Andhra Pradesh, Bihar, Himachal Pradesh, Maharashtra, Madhya Pradesh, Orissa, Gujarat and Rajasthan where it has not been made functional so far as elections to the Panchayats are yet to be held there in conformity with the Extension Act. It would have been better if the provisions of the extension Act were extended to the non-scheduled areas. But none of the States has taken any initiative in this regard except Madhya Pradesh and, that too, as late as in 1999. The State has extended most of the powers meant for the relevant Act for the Vth Scheduled Areas to all the GSs of the State. The field experiences across the country do not however give a bright picture about the functioning of the GSs except a few examples here and there. The GSs have functioned better in the southern States than in States elsewhere in the country. This is so because GSs in the southern States are endowed with meaningful functions. These States have another

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

advantage in that they have better socio-economic conditions, higher literacy, effective land reforms, relatively better position of vulnerable sections including women and impact of social reform movements in this part of the country. The example of Kerala is worth mentioning. Discussions were held at local level comprising groups of 25-30 people and working groups were constituted at the local level comprising the GS members on various issues of local importance. Thousands of persons were identified as facilitators for these groups.

**COMPOSITION AND FUNCTIONING OF GRAM SABHA**

**Secretary, office, etc. of Gram Sabha -** The Secretary of the Gram Panchayat will be deemed to be the Secretary of the Gram Sabha. In a situation where there are more than one Gram Sabhas in a Gram Panchayat, the Secretary of the Gram Panchayat will be the Secretary of all the Gram Sabhas. (2) The Gram Sabha may appoint an Assistant-Secretary from its members apart from the Secretary. But the Assistant Secretary will not be entitled to any pay, honorarium etc. He or she will execute his duties honorarily. **Gram Sabha meetings to be in public** -(1) Every meeting or proceeding of the Gram Sabha will be conducted in public, (2) Even if a meeting of the Gram Sabha is to be held in a closed building, there will not be any provision of closing the doors or prohibiting entry. **Method of taking decisions**-(1) As far as possible, the working of the Gram Sabha will be done with consensus. (2) In the condition of non-consensus on any issue in a meeting, that matter will be discussed in the meeting to be held after one week or later, as decided by the Gram Sabha. (3) If there is no consensus in the second meeting also, a decision will be taken on the basis of a majority. But there is a compulsion of quorum in such meetings. In the absence of quorum the matter will be considered void. The issue may subsequently be decided by a majority whenever the quorum is completed.

**Date and time of meetings of Gram Sabha** -(1) Gram Sabha will hold a meeting at least once in two months. The Gram Sabha may decide a fixed date (means English date, Indian date or the day of the week), time and place of the meeting permanently. In such a case there would be no need to provide any type of information for specific meetings.

**Special meeting of Gram Sabha**: Apart from its regular meetings, in the following circumstances special meetings of the Gram Sabha may be held: (i) If it is so decided in the general meeting of the Gram Sabha, (ii) If there is a proposal in the Panchayat which needs to be considered by the Gram Sabha, (iii) If an officer requests the Sarpanch, (iv) On the basis of the written information given to the Secretary by at least 5 percent of total members of Gram Sabha or 25 members, whichever is more.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ROLE OF GRAMSABHA IN RURAL DEVELOPMENT & POLITICS
{Bi-Monthly} Volume – IV Special Issue - II January 2016

**Procedure of the Standing Committees of GramSabha:** -The procedure of the Standing Committees of Gram Sabha will be the same as of Gram Sabha as follows: (1) Meetings of all Committees including Gram Panchayat will be in open, (2) Notice of every meeting of the Standing Committee, specifying the date, time and place thereof and business to be transacted thereat shall be given by the Secretary of the Standing Committee at least three days in advance. (3) The quorum necessary for the meeting of the meeting of the Standing Committee shall be one-half, including the President. (4) A member of Gram Sabha may attend any meeting of Standing Committee. He may ask any question on the topic of the discussion with the permission of the chair. But he or she will not have the right to vote at the time of final decision All the decisions of the Standing Committees will be taken as per the procedure for the Gram Sabha. (6) The gist of the important decisions taken in the meetings of the Standing Committees will be recorded.

